**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दत्तात्रय माणिकराव सुरासे,<br>एम. जी. एम. हॉस्पिटलजवळ, घर नं. ५-२६-१,<br>अजबनगर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>दि औरंगाबाद पिपल्स को-ऑप बँक लि., न्यू दलालवाडी रोड, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>दि औरंगाबाद पिपल्स को-ऑप बँक लि., न्यू दलालवाडी रोड, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. डी. जी. पवार, वसुली अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद<br>- श्री. देविदास मा. पालोदकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-११-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, विचाराधीन बँक अवसायनाखाली गेली असून त्यावर प्रशासकाची नियुक्ती झाली आहे. सदर बँक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमान्वये नोंदविली आहे व मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी अशा संस्थाबाबत दिलेल्या निर्णयानुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ या संस्थेला लागू होत नाही. आयोगास पुढे असेही अवगत करण्यात आले आहे की, अपिलार्थी हे बँकेचे कर्मचारी असून त्यांनी स्वतःची विविध विषयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थीचे दिनांक १९-०४-२००१ चे पत्र आयोगास प्राप्त झाले असून त्यामध्ये त्यांनी दिनांक ०३-१०-२००९ च्या माहिती अर्जाने मागितली संपूर्ण माहिती मिळाली असून त्यांचे समाधान झालेले आहे त्यामुळे त्यांच्या दिनांक २४-०२-२०११ च्या व्दितीय अपील अर्जाची सुनावणी रद्द करण्यात यावी असे नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय माणिकराव सुरासे, एम. जी. एम. हॉस्पिटलजवळ, घर नं. ५-२६-१, अजबनगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, दि औरंगाबाद पिपल्स को-ऑप बँक लि., न्यू दलालवाडी रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. आर. जी. बाकलीवाल,<br>प्रो. प्रा. आरजीबी एंटरप्रायझेज, ३, पन्नालाल नगर, नालंदा शाळेजवळ, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वार्ड अधिकारी, वार्ड फ, महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आर. जी. बाकलीवाल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वार्ड अधिकारी, वार्ड फ, महानगरपालिका, औरंगाबाद<br>- श्री. पाटणी एम. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद<br>- श्री. रविंद्र निकम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब आयोगासमोर सुनावणीच्या वेळी मान्य केली तथापि त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही व ती खालीलप्रमाणे आहे असेही त्यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले.

" अपिलार्थी यांनी १९७८ ते २००२ या कालावधीतील वर्षनिहाय मालमत्ता कर तपशीलाबाबतची माहिती मागितली आहे याबाबत सन १९७८ ते १९८२ या कालावधीची माहिती त्यांना मिळाली नाही बाकी सर्व माहिती प्राप्त झाली आहे. "

ही माहिती माहिती या व्याख्येत (कलम २ (च)) येत आहे व त्यामुळे अपिलार्थीस देय होत आहे. ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांना देय होत असलेली सन १९७८ ते १९८२ या कालावधीची संपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आर. जी. बाकलीवाल, प्रो. प्रा. आरजीबी एंटरप्रायझेज, ३, पन्नालाल नगर, नालंदा शाळेजवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वार्ड अधिकारी, वार्ड फ, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद, | : | अपीलकर्ता |
| | प्लॉट नं. १३, बशीर कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. खॉन अझमन, कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद<br>- श्री. रविंद्र निकम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिति अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना त्यांच्या दिनांक १७-१२-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये डिसेंबर २००९ मध्ये उप शिक्षणाधिकारी, महानगरपालिका पद भरण्यासाठी त्यांनी स्वत: केलेल्या अर्जावर सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका यांनी आयुक्त, महानगरपालिका यांना दिलेले पत्र व आयुक्त यांनी केलेली शिफारस पत्रावर कोणती कार्यवाही करण्यात आली, त्याचप्रमाणे राजीव गांधी संस्थेचे पत्र यावर कोणता निर्णय झाला त्यासंबधी प्रत व आवक जावक अनुक्रमांक ही माहिति मागितली आहे ती त्यांना आतापर्यंत मिळाली नाही. अपिलार्थीने ही माहिति टपालाव्दारे मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिति अधिकारी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिति पुरविण्यात यावी असे निर्देश दिले होते. तथापि आजपावेतो अपिलार्थीस माहिति प्राप्त झाली नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जामध्ये संदिग्धता दिसत आहे, तथापि प्रथम अपिलाच्या कार्यवृत्तांतात माहिति उपलब्ध असून देण्यात येईल याबाबत ऊहापोह केल्याचा आढळून येत आहे, त्यामुळे ज्या प्रकारे माहिति उपलब्ध होती त्याप्रमाणे ती अपिलार्थीस देणे आवश्यक होते. आता जन माहिति अधिकारी यांना ही माहिति अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल. त्याचप्रमाणे माहिति अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) अन्वये या प्रकरणी विहित मुदतीत माहिति न दिल्यामुळे या विलंबासाठी जबाबदार असलेले जन माहिति अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिति अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिति अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२.	जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे अधिकारी कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद, प्लॉट नं. १३, बशीर कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद.

२.	जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मण भिकाजी आव्हाड, : अपीलकर्ता
रा. रांजणगाव शेणपुंजी, पो. घाणेगांव, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नागमठाण,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, तालुका
वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४३९
२ सुनावणीची तारीख दि. ०३-०५-२०११
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी : अनुपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नागमठाण,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद - श्री. एस. सी. मेनगर
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद - श्री. एच. बी. कहाटे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २३-१२-२००९
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --
६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. २८-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००१ ते २३-१२-२००९ या कालावधीची ग्रामपंचायत कार्यालय, नागमठाण, तालुका वैजापूर येथील एकूण १८ मुद्दयांवर विविध माहिती विस्तृत स्वरुपात मागितली आहे. माहितीची व्याप्ती फार मोठी आहे त्यामुळे त्यांना माहिती संकलीत करण्याकरिता वेळ लागला. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पहाणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जावरुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विस्तृत व व्यापक स्वरुपात माहिती मागविली आहे. अपिलार्थी दारिद्र्यरेषेखालील आहेत. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नागमठाण, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०३-२०१० रोजी कार्यालयात माहिती पाहणीकरिता उपस्थित राहण्यासाठी दिनांक २०-०३-२०१० रोजीच्या पत्राने अपिलार्थीस कळविले आहे, अपिलार्थी उपस्थित झाले नाहीत. यापूर्वी सुध्दा अशाच प्रकारे दिनांक ०७-०१-२०१० च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-०१-२०१० रोजी कार्यालयात उपस्थित राहून माहिती पहावी असे अपिलार्थीस कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही असे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद विस्तार अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक ११-०३-२०१० रोजी सुनावणी ठेवली होती तथापि अपिलार्थी उपस्थित झाले नाहीत व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस पुन्हा एकदा पाहणी उपलब्ध करुन द्यावी, अपिलार्थीने प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अतः जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन एक संधी द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था

करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण भिकाजी आव्हाड, रा. रांजणगाव शेणपुंजी, पो. घाणेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नागमठाण, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बाळासाहेब म्हस्के,<br>राहुलनगर, रेल्वेस्टेशन जवळ, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>पदमपुरा, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>पदमपुरा, औरंगाबाद - श्री. व्ही. जी. देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०२-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून चौकशीबाबतच्या विविध कागदपत्राची मागणी केली आहे. याबाबत अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर केला आहे असे अपिलार्थीला यापूर्वीच कळविण्यात आले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १७-०२-२०१० रोजी सुनावणी घेऊन सात दिवसात विनामूल्य माहिती द्यावी असा निर्णय दिला आहे. त्यानुसार अपिलार्थीस संपूर्ण माहिती त्यांच्या कार्यालयात दाखविण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थीचे राज्य माहिती आयुक्तांना दिनांक २३-०४-२०११ रोजी लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे की, या व्दितीय अपील संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे.

या पाश्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळासाहेब म्हस्के, राहुलनगर, रेल्वेस्टेशन जवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख लईक अहेमद शेख शफीयोद्दीन, | : | अपीलकर्ता |
| गल्ली नं. ४, आसेफिया कॉलनी, घाटी रोड, औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | | |
| जन अपिलीय अधिकारी, | : | |
| सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख लईक अहेमद शेख शफीयोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण)<br>उपविभाग, औरंगाबाद - श्री. आर. आर. जयस्वाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. व्ही. जी. देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे आढळून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये आर. टी. ओ. कार्यालयात असलेले हॉटेल, झेरॉक्स, आदि दुकाने भाडे तत्वावर देण्यात आले आहेत याबाबत माहिती मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता यांनी सदरची माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याने अपिलार्थीचा मूळ अर्ज आर. टी. ओ. कार्यालयाकडे पाठविला व ही बाब अपिलार्थीस त्या पत्राची प्रत देऊन कळविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १७-०२-२०१० रोजी सुनावणी घेऊन सदरची माहिती उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण), औरंगाबाद यांचेशी संबंधित नसून प्रादेशिक परिवहन कार्यालय औरंगाबाद यांचेशी संबंधित असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. अपिलार्थी यांना त्यामुळे प्रादेशिक परिवहन कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा लागेल व ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख लईक अहेमद शेख शफीयोद्दीन, गल्ली नं. ४, आसेफिया कॉलनी, घाटी रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अर्जुन साहेबराव नवपुते, : अपीलकर्ता
मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, ज्ञानसागर प्राथमिक आश्रमशाळा, खोडेगांव,
तालुका जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, ज्ञानसागर प्राथमिक आश्रमशाळा, खोडेगांव,<br>तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अर्जुन साहेबराव नवपुते, मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ज्ञानसागर प्राथमिक आश्रमशाळा, खोडेगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपीलकर्ता
हिना मंजिल, मलीक अंबर उड्डाणपूल जवळ, टाऊन हॉल,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - श्री. शे. मोईनोद्दीन | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण विभाग,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. कांबळे आर. जे, लिपिक | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. आर. व्ही. निकम, कार्यालय अधीक्षक | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०५-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. त्यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद जिल्ह्यात मुकबधीर, अपंग व अंध अशा शाळेतील मुलांचे विकलांग प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती, त्यांचे पत्त्यासहीत फोटो, नाव इत्यादी वैयक्तीक अशी माहिती मागितली आहे. ही माहिती त्रयस्थांची होत आहे. याकरिता प्रकरणात जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, हिना मंजिल, मलीक अंबर उड्डाणपूल जवळ, टाऊन हॉल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गाजरे विशाल शेषराव, : अपीलकर्ता
मु. पो. माळीवाडा, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. एस. डी. हिवाळे, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी ज्ञानदीप इंग्लीश स्कुल, दौलताबाद, तालुका जिल्हा औरंगाबाद या शाळेच्या चौकशी अहवालाच्या सत्यप्रती, सन २००९ ते २०१० या शैक्षणिक वर्षाच्या पटपडताळणी अहवालाच्या सत्यप्रती, शाळेवर कुठली कारवाई केली असल्यास त्याची सत्यप्रत, अशी माहिती मागितली आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, ज्या शाळेची माहिती मागितली आहे ती शाळा कायम विना अनुदानित असून या शाळेस शासनाचे कोणतेही अनुदान नसल्यामुळे त्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही म्हणून अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने पुढे सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, संबंधित शाळेची चौकशी विस्तार अधिकारी यांनी केलेली आहे व त्यांचा अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या ताब्यात आहे. त्याचप्रमाणे २००९ ते २०१० या कालावधीची पट पडताळणी विस्तार अधिका-याने केली असून याबाबतची माहिती ही विस्तार अधिकारी यांच्याकडे आहे. तथापि शाळेवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

वरील पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सार्वजनिक प्राधिकरणाने केलेल्या कामकाजामुळे (Public Activity) निर्माण झाली असल्याने तसेच माहिती या २ (च) मधील व्याख्येमुळे सार्वजनिक प्राधिकरणास उपलब्ध होऊ शकत असल्याने अपिलार्थी यांनी दिनांक २१-०१-२०१० अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ व २ वरील माहिती देय होत आहे व ती अपिलार्थीस द्यावी लागेल व मुद्दा क्रमांक ३ बाबत माहिती निरंक आहे असे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले हि बाब त्यांना अपिलार्थीस कळवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांना देय असलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०५-२०११**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गाजरे विशाल शेषराव, मु. पो. माळीवाडा, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवाजी बाजीराव दाभाडे, : अपीलकर्ता
मु. पो. माणिकनगर, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- श्री. गजानन सुगदेव सुसर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १५-१२-२००९ च्या मूळ अर्जान्वये त्रयस्थाच्या नियुक्तीबाबत विविध मुद्दयांवर माहिती मागितली आहे. या माहितीचा शोध घेऊनही अशा प्रकारची नस्ती कार्यालयात उपलब्ध झाली नाही. यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद सुनावणी घेतली सुनावणीस शाळेचे मुख्याध्यापक उपस्थित होते. सुनावणी दिनांक ०८-०२-२०१० रोजी घेण्यात आली. ही सुनावणी पुढे ढकलून दिनांक २२-०२-२०१० रोजी व दिनांक ०२-०३-२०१० रोजी घेण्यात आली. या सुनावणीमध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात नस्तीचा शोध घेऊन उपलब्ध माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला. सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतला आहे की, सर्व बाबींची शहानिशा केल्यानंतर अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अभिलेख्यामध्ये उपलब्ध नाही असे आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात आले आहे. अपिलार्थी सुनावणीच्या वेळी उपस्थित होते असे उपलब्ध कागदपत्रावरुन आढळून येते. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०३-२०१० रोजी व्दितीय अपील सादर केले आहे. प्रथम अपील निर्णय दिनांक १७-०४-२०१० रोजी निर्गमीत झाला आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील या स्तरावर बंद करण्यायोग्य ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी बाजीराव दाभाडे, मु. पो. माणिकनगर, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनिल लिंबाजी कामकर, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहा. अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
मंडळ, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहा. अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद- श्री. ए.आर.सरोदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००७ ते दि.३१.१०.२००९ पर्यंतची सर्व कामांबाबतची गावनिहाय,तालुकानिहाय,जिल्हानिहाय,उपविभागनिहाय मजुरांच्या याद्या, हजेरीपट, मोजमाप पुस्तिकेची छायाप्रती अशी तपशीलवार विस्तृत माहिती मागितली आहे. औरंगाबाद मंडळ कार्यालयाअंतर्गत औरंगाबाद, जालना,बीड,उस्मानाबाद, लातूर व नांदेड असे ६ विभाग येत असून त्यांचे अंतर्गत एकूण ८ जिल्हे आहेत. त्यासाठी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील प्रत्येक विभागातील माहिती अंदाजे ३५ ते ४० हजार पृष्ठे होऊ शकते. याबाबत कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग लातूर यांनी त्यांच्याकडील माहितीसंदर्भात दि. १९.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले असून माहिती पुरविण्यासाठी एकूण खर्च ₹७५,४७८/- एवढा निधी शासनाकडून प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविले आहे. याशिवाय अपिलार्थी त्यांच्या कार्यालयामध्ये केव्हाही उपस्थित राहून संपूर्ण माहिती पाहू शकतात, असेही कळविले आहे. अपिलार्थी यांनी फार मोठया प्रमाणात माहिती मागितली असून त्याचा कालावधी सुमारे तीन वर्षांचा आहे. अशाप्रकारे माहिती मागणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अभिप्रेत नाही, असे आयोगाचे मत आहे. याकरिता प्रत्येक विभागनिहाय कार्यालयामध्ये अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(९)अन्वये एक दिवस निश्चित करुन संबंधित अभिलेखे पाहणीसाठी उपलब्ध करुन देणे यथोचित आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.याकरिता अपिलार्थीस प्रत्येक विभागाकडून एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी लागेल. या प्रकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर)मंडळ,औरंगाबाद श्री. दे.घ. पाझारे यांना पुढाकार घेऊन प्रत्येक विभागामध्ये समन्वयाने एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित अभिलेख पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी व्यवस्था करावी लागेल व ही कार्यवाही दोन महिन्याच्या आत संपुष्टात आणावी लागेल.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ,औरंगाबाद यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे प्रत्येक विभागामध्ये समन्वयाने एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी

संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच साठ दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक 03-05-2011** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल लिंबाजी कामकर,द्वारा श्री.रणजित हरिभाऊ मनोरे, रेल्वेस्टेशन जहागिरदार कॉलनी, मुजीब सर्व्हीसींग औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहा. अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा -अधीक्षक अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग क्र.१, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग क्र.१, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उप कार्यकारी अभियंता, ल.पा.विभाग क्र.१,औरंगाबाद - श्री. पी.एस.सरकटे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, ल.पा.विभाग क्र.१,औरंगाबाद- श्री. आर.पी.काळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पुरविण्यासाठी रु.२०५/- इतक्या शुल्काचा भरणा कार्यकारी अभियंता, ल.पा.विभाग क्र.१ यांच्या कार्यालयात करावा, असे दि. २५.०१.२०१० रोजी विहित मुदतीत कळविले आहे. असे कळविताना या शुल्काची रक्कम कोणत्या उपशीर्षाखाली भरावयाची याचा तपशील दिला आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १०.०२.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली व सुनावणीमध्ये दि. २३.०२.२०१० पर्यंत माहिती देण्यात यावी, असा निर्णय घेऊन अपील निकाली काढण्यात आले. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.१,औरंगाबाद यांनी दि. १०.०२.२०१० रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी कळविले आहे की, दि. २३.०२.२०१० रोजी कार्यालयामध्ये उपस्थित राहून अपिलार्थीने माहिती घेऊन जावी. आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०४.२०११ रोजी अपिलार्थीस एकूण ६८ पृष्ठांची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविल्याचे सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख,प्लॉट नं. ४६५, गल्ली नं.०४, न्यु हनुमाननगर, गारखेडा परिसर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, ल.पा.विभाग क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल.पा.विभाग क्र.१,औरंगाबाद यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रविंद्र भागाजी खरात,<br>रा.करमाड,ता.जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार,महसूल-१, तहसील कार्यालय,औरंगाबाद - श्री. डी.एन.भारस्कर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(महसूल-१) यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील अभिलेख विभागाशी संबंधित आहे. तसेच यासंदर्भातील अपिलार्थी यांनी त्यांचे प्रथम अपील त्यांच्या

कार्यालयात दाखल केलेले नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २१.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम व द्वितीय अपील प्रकरणाच्या प्रतीसह प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.२१.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र भागाजी खरात,रा.करमाड,ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१),तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,औरंगाबाद यांना अपिलार्थीच्या प्रथम व द्वितीय अपिलाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. उस्मानशाह ईब्राहीमशाह अन्वीकर,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, औरंगाबाद - श्री.बालाजी क्षीरसागर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद - श्री. वामन कदम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राात झाल्याची तारीख | | दि. १०.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००१ ते २००८ या नऊ वर्षांच्या कालावधीतील 'छप्परबंद-१४' या जातीच्या मंजूर केलेल्या सर्व प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती व या प्रमाणपत्रासोबत सादर केलेल्या पुराव्याच्या, वंशावळीच्या व शपथपत्रांच्या व इतर कागदपत्रांच्या झेरॉक्सप्रती मागितल्या आहेत. ही माहिती फार मोठया विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला आहे. ही सर्व माहिती एकंदर ३५,००० पृष्ठांची होत असून त्या कागदपत्रांच्या झेरॉक्सकरिता ₹७०,०००/-इतका खर्च येत आहे. ही बाब अपिलार्थीस दि. १०.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविली असून निधीची उपलब्धता होताच माहिती पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीने यावर प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे वैध प्रमाणपत्र आजपावेतो सादर केलेले नाही, असेही त्यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढे उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीने फार मोठया प्रमाणातील त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. अधिनियमातील कलम ११ खाली त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून त्याबाबतची नोंद घेऊन कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये २५ व्यक्तींची यादी दिलेली आहे. या २५ व्यक्तींची सविस्तर माहिती अपिलार्थी मागत आहेत व उर्वरित २००१ ते २००८ या कालावधीत मंजूर केलेल्या प्रमाणपत्राच्या झेराक्स प्रती मागत आहेत, असे त्यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीने मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित मोठया प्रमाणात असल्याने जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या २५ व्यक्तींशी संबंधित अभिलेखे संबंधित त्रयस्थ पक्षास अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदीनुसार व्यापक जनहित विचारात घेऊन, त्यांची बाजू मांडण्याची एक संधीही देऊन, त्यांचे म्हणणे नोंदवून पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील. त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

या सर्व पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्थ पक्षाची बाजू ऐकून घेतल्यानंतर एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उस्मानशहा ईब्राहिमशाह अन्वीकर, गल्ली क्र.२०, नवीन बायजीपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय नामदेव पाटील,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष भूसंपादन अधिकारी,द्वारा जिल्हाधिकारी<br>कार्यालय,जळगाव | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,जळगाव | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विशेष भूसंपादन अधिकारी, जळगाव -प्रतिनिधी - श्री. एस.बी.भालेराव, अव्वल कारकुन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - निवासी उपजिल्हाधिकारी, जळगाव | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.त्यांची बाजू ऐकून घेणे

आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय नामदेव पाटील,एन-९,आर/२३५,म्हाडा कॉलनी,रायगडनगर,बळीराम पाटील शाळेजवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मुंडे सतिश आनंदराव, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्राचार्य, ओंकारनाथ मालपाणी विधी
महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी तथा :
प्राचार्य, ओंकारनाथ मालपाणी विधी
महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०४.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे श्री.ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर या

महाविद्यालयातील त्रयस्थ पक्ष श्री. गोविंद वरपे या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक माहितीची मागणी केली आहे व ही माहिती द्यावयास जन माहिती अधिकारी, श्री.ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर तयार असून याकरिता महाविद्यालयाच्या नियमानुसार ₹११८/-इतक्या शुल्काचा भरणा करावा असे अपिलार्थीस दि. २२.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २५.०२.२०१० रोजीच्या पत्रावर याबाबत आक्षेप घेतल्याचे दिसून येत असून याबाबतचा खुलासा प्राचार्य तथा जन अपिलीय अधिकरी यांना मागितल्याचे दिसून येत आहे. यावर प्राचार्य, श्री. ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर यांनी अपिलार्थीस दि. ०४.०३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी पत्राद्वारे कळविलेले योग्य असल्याचे नमूद केले आहे.हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्याचा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर प्रकरण आयोगाच्या स्तरावर बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुंडे सतिश आनंदराव,घर नं.५८५, सर्व्हे नं.६८, मुंडे निवास,जयभवानी नगर,एन-४, सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, श्री.ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय, संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,श्री.ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय, संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जितेंद्र गजेंद्र नरवडे, : अपीलकर्ता
रा.कन्नड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वनक्षेत्रपाल,
प्रादेशिक वन विभाग,कन्नड,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक उपवनसंरक्षक अधिकारी,प्रादेशिक वन
विभाग,कार्यालय,कन्नड,जि.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी भारंबा तांडा,खातखेडा,मेहेगाव येथे रोपवाटिकेमध्ये झालेल्या कामासंदर्भात, किती झाडे लावली,मजूरांच्या

पगारपत्राच्या छायाप्रती,शासनाकडून किती निधी आला,शासनाच्या नियमाप्रमाणे मजूरांना काय मजूरी आहे, कामे कोणी करावी, केळरोपांची लागवड कशी करावी इत्यादीची संपूर्ण माहिती व्यक्तिशः मागितली आहे. माहितीचा कालावधी पंधरा दिवसांचा आहे, असे नमूद केले आहे. तथापि त्यांना कोणत्या कालावधीची माहिती अपेक्षित आहे, त्या कालावधीचा उल्लेख केल्याचे दिसून येत नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल,प्रादेशिक वन विभाग, कन्नड यांनी दि. ०५.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी सादर केलेले दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र जुने असून नवीन प्रमाणपत्र पाठवावे, असे कळविल्याचे दिसून येत आहे. तथापि आजमितीस अपिलार्थीस माहिती मिळाली किंवा कसे, याची सद्यस्थिती आयोगास अवगत झाली नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येत बसत असल्याने देय होत आहे. याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीने त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे वैध प्रमाणपत्र सादर केल्यास विनामूल्य द्याव्या लागतील अन्यथा सशुल्क द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीने त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे वैध प्रमाणपत्र सादर केल्यास विनामूल्य द्याव्यात अन्यथा सशुल्क द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जितेंद्र गजेंद्र नरवडे,मु.पो.समर्थनगर,कन्नड,ता.कन्नड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल,प्रादेशिक वन विभाग, कन्नड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,कन्नड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. ज्ञानेश्वर श्रीराम सोनवणे,<br>रा.रामपुरा (महालपिंप्री), ता.जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सदस्य सचिव,<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती<br>क्र.१,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती<br>प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद- श्रीमती सी.के.कुलाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहे डिसेंबर, २००६ ते जानेवारी, २००७ या कालावधीत विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव क्र.१०९ ते १२० याबाबतची माहिती मागितलेली आहे. त्यांच्या कार्यालयात ११ वी,१२ वी विज्ञान शाखेत शिकत असलेले मागासवर्गीय विद्यार्थी, राखीव जागेवर निवड झालेले कर्मचारी,शासन व निमशासकीय कार्यालयातील कर्मचारी, पदोन्नती क्षेत्रात मोडत असलेले शासकीय,निमशासकीय अधिकारी/कर्मचारी, न्यायालयीन प्रकरणे, तक्रार प्रकरणे, जातीचा दाखला नाकारल्याचे अपील प्रकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीस उभे राहू इच्छित असलेले उमेदवार यांचे जातीचे प्रमाणपत्रांची पडताळणी केली जाते व प्रस्ताव येत असतात. त्यामुळे अपिलार्थी यांनी नेमक्या कोणाच्या संदर्भात क्र.१०९ ते १२० मागितली आहे, हे ज्ञात होत नाही व ही बाब स्पष्ट केल्यास पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस दि. १९.१२.२००९ रोजी कळविले आहे. त्याचप्रमाणे इतर चार मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपात व खुलासे मागणाऱ्या स्वरुपाची माहिती असल्यामुळे अधिनियमातील माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही, असेही कळविले आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी दि. ०९.०२.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी त्यांना हव्या असलेल्या प्रकरणाचा तपशील उदा. नविन नियुक्ती/शासकीय सेवा/निमशासकीय सेवा/तक्रार प्रकरण अथवा न्यायालयीन यापैकी कोणती माहिती हवी आहे, याचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे आठ दिवसात दाखल करावा, त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य माहिती द्यावी. यावर अपिलार्थी यांनी त्यांना प्रतिसाद दिलेला नाही. आयोगापुढील कागदपत्रांवरुनही याबाबत दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी पुन्हा एकदा संधी देण्याकरिता प्रथम अपिलासंदर्भातील निर्णय नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावा. तदनंतर अपिलार्थी यांना पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात प्रतिसाद द्यावा लागेल व तदनंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी अपिलार्थीस पुन्हा एकदा त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णयाची प्रत नोंदणीकृत टपालाद्वारे

पाठवावी. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानेश्वर श्रीराम सोनवणे,मु. रामपुरा (महालपिंप्री), पो.वरुड(काजी), ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख हबीब पाशा पि.गुलाम रसूल, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | पत्रावर दिनांक नाही. |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख हबीब पाशा पि.गुलाम रसूल, घर नं. १-१६-३२, जुना बाजार, औरंगाबाद - ४३१ ००१

२. जन माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामनाथ कडुजी इथापे, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
शेवगाव,जि.अहमदनगर.
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),जिल्हा
परिषद,अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | तत्कालीन जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक, ग्रामपंचायत, दहिफळ नवे, ता.शेवगाव, जि.अहमदनगर- श्री.जी.बी.चेमटे | : उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक, ग्रामपंचायत, दहिफळ नवे, ता.शेवगाव, जि.अहमदनगर- श्री.जी.बी.चेमटे यांचे वकील श्री. व्ही.ए.ढाकणे | : उपस्थित |
| ३.४ | विद्यमान जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक, ग्रामपंचायत, दहिफळ नवे, ता.शेवगाव,जि.अहमदनगर- श्री.पवार डी.एस | : उपस्थित |
| ३.५ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - विस्तारअधिकारी (पं.),पंचायत समिती, शेवगाव,जि.अहमदनगर - श्री.ए.व्ही.इंगळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी, त्यांच्या वकिलासह व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीसाठीचा दि. २६.०९.२००९ रोजीचा मूळ अर्ज पंचायत समिती,शेवगाव जि.अहमदनगर यांच्याकडे गट विकास अधिकारी यांना उद्देशून केला होता. या प्रकरणी ग्रामसेवक, ग्रामपंचायत दहिफळ हे जन माहिती अधिकारी असल्याकारणाने गट विकास अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज दि. २०.१०.२००९ रोजी वर्ग केला. तथापि तो अर्ज संबंधित ग्रामसेवक यांच्याकडे प्राप्त झाला नाही, असे आज जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही.ए.ढाकणे यांनी आयोगास सांगितले. त्यानंतर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार व मूळ अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०१.२०१० रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठविली आहे. तसेच तदनंतर सदरची माहिती गट विकास अधिकारी यांच्याकडे दि. १५.०२.२०१० रोजी गट विकास अधिकारी यांच्या समक्ष सीलबंद करुन पुन्हा अपिलार्थीच्या वकिलाकडे पाठविण्यात आली आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. युक्तिवादामध्ये त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे अपिलार्थी यांना सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमाच्या योग्य अंमलबजावणीसाठी त्यांनी त्यांचे अर्ज संबंधित कार्यालयामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडेच दाखल करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे नाव व पदनाम स्पष्टपणे दर्शविणारा फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावून अधिनियमातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी दक्ष राहणे आवश्यक आहे.

अत: प्रकरण निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे नाव व पदनाम स्पष्टपणे दर्शविणारा फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात

लावून अधिनियमातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी दक्ष राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामनाथ कडुजी इथापे,भगतसिंगनगर हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं. सी-२/९, हर्सूल, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, दहिफळ नवे, ता.शेवगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, शेवगाव, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र गंगाधर उगले, : अपीलकर्ता
मु. पो. कांताई निवास, यशवंतनगर, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५६

२ सुनावणीची तारीख दि. ०४-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
वरिष्ठ लिपिक, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद - श्री. व्य. रा. पापुलवार

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद - श्री. टि. डी. कांबळे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-११-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-१२-२००९

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३१-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रकरणाची सद्यस्थिती अवगत करुन देण्यासाठी मुदतवाढ मागितली. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र गंगाधर उगले, मु. पो. कांताई निवास, यशवंतनगर, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जहाँगीरखाँ फकीरखाँ पठाण,<br>बंदी क्रमांक सी. ६००९, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह,<br>हर्सूल, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा परिविक्षा अधिकारी, बीड<br>- प्रतिनिधी - श्री. एस. पी. सांगळे, परिविक्षा अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बीड<br>- श्री. डी. एम. गिरी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा दिनांक २०-०७-२००९ चा मूळ अर्ज तसेच दिनांक ०३-११-२००९ चा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेले नाहीत. राज्य माहिती आयोग खंडपीठ यांच्या व्दितीय अपिलाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या सुनावणीच्या नोटीसीबरोबर ही कागदपत्रे त्यांना प्राप्त झाली आहेत. त्यावर त्यांनी माहिती तयार केली आहे. अपिलार्थीच्या तीन मुलांना अनुदान मंजूर असून त्याच्या तपशीलाच्या प्रती आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. ही माहिती ते अपिलार्थीस देऊ शकतात. या पार्श्वभूमीवर आयोग असे निदेश देत आहेत की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती जी आज जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे ती खास दुतामार्फत औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह कार्यालयामार्फत अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पाठवावी लागेल. कार्यालय प्रमुख जिल्हा मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपिलार्थीस त्यांच्या समक्ष देऊन त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्याची व्यवस्था करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे व अपिलार्थीस देय असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व खास दुतामार्फत पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जहाँगीरखाँ फकीरखाँ पठाण, बंदी क्रमांक सी. ६००९, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, हर्सूल, औरंगाबाद. (व्दारा, कार्यालय प्रमुख, जिल्हा मध्यवर्ती कारागृह,

हर्सूल, औरंगाबाद)

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा परिविक्षा अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कार्यालय प्रमुख, जिल्हा मध्यवर्ती कारागृह, हर्सूल, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख हुसेन शेख याशीन,<br>रा. पंढरपूर, फुलेनगर, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>जालना-२ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>जालना-२ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>जालना-२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>जालना-२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जालना वाटूर फाटा रोडवरील झाडे तोडण्याचे टेंडर कोणाला व किती रुपयात दिले, याबाबतचे पब्लिकेशन कोणत्या पेपरमध्ये दिले याबाबतची माहिती दिनांक १५-१२-२००९ अन्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना-२ यांच्याकडे मागितली आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना-२ यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना-२ यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना-२ यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख हुसेन शेख याशीन, रा. पंढरपूर, फुलेनगर, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना-२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना-२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण रघुनाथ गायके, : अपीलकर्ता
मु. पो. रेल, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. ए. एस. कोंडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. व्हि. के. पालीमकर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असून ती कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जावी असे दिनांक २६-११-२००९ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०७-१२-२००९ रोजी उपस्थित राहून कागदपत्रांची पाहणी केली तथापि माहिती अर्धवट असल्याने घेतली नाही असा शेरा लिहून पोच दिली आहे. यानंतर जन माहिती अधिका-याने दिनांक ११-१२-२००९ रोजी साध्या पोस्टाने माहिती अपिलार्थीस पाठविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०१-०२-२०१० व दिनांक ०८-०२-२०१० अशी दोन दिवशी सुनावणी घेतली आहे. अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिका-याने अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले.

अपिलार्थी यांनी दिनांक ०७-०४-२०१० रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, तथापि अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलात त्यांना चुकीची व अर्धवट माहिती मिळाली असे मोघम स्वरुपात नमूद केले आहे. अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अर्धवट व चुकीची मिळाली हे त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावे लागेल व त्यानंतर पंधरा दिवसाच्या आत मूळ अर्जाच्या संबंधात उर्वरीत माहिती जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी कळविल्यास अपिलार्थीस मूळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने देय असलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रघुनाथ गायके, मु. पो. रेल, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बी. एम. पठाण, : अपीलकर्ता

प्लॉट नं. ७१, महात्मा ज्योतिबा फुले हौसिंग सोसायटी,
जटवाडा रोड, हर्सूल, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, कुटूंब कल्याण भुवन आवार, नायडु हॉस्पिटल कंपाऊंड, पुणे रेल्वेस्टेशन समोर, पुणे - ०१

जन अपिलीय अधिकारी तथा :

सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, विश्रांतवाडी, येरवाडा मेन्टल हॉ. कॉर्नर, पुणे - ०६

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६०

२ सुनावणीची तारीख दि. ०४-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित

सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, कुटूंब कल्याण भुवन आवार, नायडु हॉस्पिटल कंपाऊंड, पुणे रेल्वेस्टेशन समोर, पुणे - ०१

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, विश्रांतवाडी, येरवाडा मेन्टल हॉ. कॉर्नर, पुणे - ०६

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०९-११-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २०-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी. एम. पठाण, प्लॉट नं. ७१, महात्मा ज्योतिबा फुले हौसिंग सोसायटी, जटवाडा रोड, हर्सूल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, कुटूंब कल्याण भुवन आवार, नायडु हॉस्पिटल कंपाऊंड, पुणे रेल्वेस्टेशन समोर, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, विश्रांतवाडी, येरवाडा मेन्टल हॉ. कॉर्नर, पुणे - ०६ यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, : अपीलकर्ता
संपादक साप्तहिक राजनिष्ठा, ए-५१, नाथनगर, सिंधी
कॉलनी मागे, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा (उपयंत्रशास्त्र) सहायक प्राध्यापक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद - श्री. एम. बी. वर्मा | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद - डॉ. वा. झि. गंधारे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी नुकताच जन माहिती अधिकारी या पदभार घेतला आहे. तथापि त्यांनी कागदपत्रांवरुन अशी माहिती दिली की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयामार्फत अपिलार्थीस दिनांक १७-०३-२०१० रोजी पुरविली आहे. तथापि असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपिलार्थीस जी माहिती द्यावयाची आहे त्याबाबत कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती न पुरवता केवळ लेखी उत्तर पाठविल्याचे आढळून येत आहे. त्याचप्रमाणे प्राचार्य जे प्रथम अपिलीय अधिकारी आहेत त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही त्यांना सुनावणी घ्यावी लागेल. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, संपादक साप्तहिक राजनिष्ठा, ए-५१, नाथनगर, सिंधी

कॉलनी मागे, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा (उपयंत्रशास्त्र) सहायक प्राध्यापक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख जमीन शेख मासुम,<br>रा. आजीमशाहीपुरा, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख जमीन शेख मासुम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०२-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी सन २००८ व २००९ मधील विद्यार्थी व कर्मचारी यांच्या संदर्भात आलेले अर्ज, निपटारा अर्ज, निपटारा न केलेल्या अर्जाबाबत माहितीच्या प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-१२-२००९ रोजी नोंदणी रजिस्टरच्या छायांकीत प्रतिकरिता रुपये १००० चा भरणा करावा असे कळविले होते. तथापि अपिलार्थी यांनी पैशाचा भरणा केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेऊन ५० दिवसाच्या आत माहिती द्यावी असे निदेश दिले. तथापि अपिलार्थीस माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०५-१२-२००९ च्या माहिती अर्जावर दिनांक १५-१२-२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील येणारे अर्जाची नोंद रजिस्टरमध्ये ठेवण्यात येते त्याची प्रत अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानुसार मुद्दा क्रमांक १, २, ४ व ६ ची माहिती प्राप्त होईल. सन २००८ व २००९ मध्ये विद्यार्थी / कर्मचारी यांचे अंदाजे १५००० अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाले आहेत. या प्रकरणातील त्रुटीच्या पत्रांची माहिती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे मुद्दा क्रमांक तीन मधील माहिती देता येत नाही. तथापि नोंदणी अर्जाच्या छायांकीत प्रतीकरिता अपिलार्थी यांनी १००० रुपयाचा भरणा त्यांच्या कार्यालयात करावा म्हणजे त्याची माहिती पुरविता येईल असे कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी १००० रुपयाचा भरणा केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर घेतलेल्या सुनावणीच्या वेळी १००० रुपयाच्या शुल्काचा भरणा केला नाही याची नोंद घेतली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील नाहीत त्यामुळे त्यांनी सदर शुल्काचा भरणा करणे आवश्यक होते. अपिलार्थी यांना १००० रुपयाचा भरणा करुन प्रथम माहिती प्राप्त करावी लागेल व त्यानंतर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस या माहितीच्या प्रती पाठवाव्या लागतील. या प्रक्रियेनंतर उर्वरीत माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना सशुल्क उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने १००० रुपयाचा भरणा केल्यानंतर माहितीच्या प्रती पाठवाव्यात व उर्वरीत माहिती त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन सशुल्क देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जमीन शेख मासुम, रा. आजीमशाहीपुरा, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार,<br>हिना मंजील, मलीक अंबर उड्डाण पुलाजवळ, टाऊन हॉल,<br>औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>आस्थापना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>आस्थापना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>आस्थापना अधिकारी-१, महानगरपालिका, औरंगाबाद<br>- श्री. अय्युब खान नूरखान पठाण | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २२-१२-२००९ च्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या व त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीबाबत दिनांक १६-०१-२०१० रोजी पत्र देऊन माहिती उपलब्ध आहे ती उपस्थित राहून घेऊन जावी असे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. दिनांक ३१-०१-२०१० रोजी अपिलार्थीने रुपये १४ इतक्या शुल्काचा भरणा केला व माहिती प्राप्त करुन घेतली आहे. त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तर दाखल आहे. अपिलार्थी यांनी एका संबंधित संचिकेची प्रत मागितली आहे ती उपलब्ध नसल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०३-२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दिनांक १७-०३-२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला की, संचिकेचा शोध घेऊन माहिती देण्यात यावी व सदरची माहिती विभागात उपलब्ध न झाल्यास अपिलार्थीस तसे कळविण्यात यावे. या संचिकेचा शोध इतर विभाग, पाणीपुरवठा विभाग मध्ये करण्यात आला तथापि त्यांच्याकडे ही संचिका उपलब्ध नाही असे त्यांच्याकडून दिनांक ०५-०९-२०१० रोजी कळविण्यात आले त्यानुसार अपिलार्थीस दिनांक १५-०४-२०१० रोजी कळविण्यात आले व त्याचबरोबर अपिलार्थीस आदेशाची झेरॉक्स प्रत देण्यात आली. अपिलार्थीने दिनांक १५-०४-२०१० रोजीचे पत्र व आदेशाची प्रत घेतली असून त्याची पोच दिनांक १६-०४-२०१० रोजी दिलेली आहे व नमूद केले आहे की, व्दितीय अपील केल्यानंतर त्यांना माहिती प्राप्त झाली आहे. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, हिना मंजील, मलीक अंबर उड्डाण पुलाजवळ, टाऊन हॉल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी-१, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. धीरज आर. भालेराव, : अपीलकर्ता
सिडको, एन-९, आर-२६/एम-१३/५१, म्हाडा कॉलनी,
रायगडनगर, ज्योती कोचिंग क्लासेसच्या वर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. धीरज आर. भालेराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- श्री. जी. एस. सुसर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - मुख्याध्यापक, उध्दवराव पाटील माध्यमिक विद्यालय, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रत नाही |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण दोन मुद्दयावर माहिती मागितली होती व ही माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये ही बाब आयोगापुढे मान्य केली व अपिलार्थीस माहिती मिळाली असल्यामुळे प्रकरण आयोगाच्या स्तरावर बंद करण्यात यावे अशी अपिलार्थीने आयोगास विनंती केली आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. धीरज आर. भालेराव, सिडको, एन-९, आर-२६/एम-१३/५१, म्हाडा कॉलनी, रायगडनगर, ज्योती कोचिंग क्लासेसच्या वर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. साळूंके कैलास प्रभाकरराव,<br>मु. पो. गोलटगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वनपरिक्षेत्र अधिकारी, वनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>वनसंरक्षक, वन विभाग, औरंगाबाद | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वनक्षेत्रपाल, औरंगाबाद वनभवन, उस्मानपुरा, औरंगाबाद<br>- श्री. जी. एम. शिंदे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक, वन विभाग, औरंगाबाद<br>- श्री. आर. पी. पाटील | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०४-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०२-२०१० च्या अर्जान्वये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत केलेल्या कामाच्यासंदर्भात सविस्तर विवरण, उपलब्ध निधी, केलेल्या कामासाठी खर्च झालेला निधी, पाणलोट इत्यादी बाबत विस्तृत माहिती सन २००७ ते २०१० या कालावधीची मागितली आहे. तथापि महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत त्यांच्या मार्फत या कालावधीत कोणत्याही प्रकारची कामे झाली नसल्याने तसे अपिलार्थीस दिनांक ०४-०३-२०१० रोजी कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २२-०३-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना इतर योजने अंतर्गत या कालावधीत झालेल्या कामाची माहिती सुध्दा अपेक्षिली आहे त्यामुळे ती माहिती त्यांना विनामूल्य देण्यात यावी. या पार्श्वभूमीवर तसेच माहितीची व्याप्ती विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) अनुसार जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, औरंगाबाद वनभवन, उस्मानपुरा, औरंगाबाद यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात सन २००७ ते २०१० या कालावधीत नमूद केलेल्या कामाबाबतची माहिती पहाणीसाठी एक दिवस निश्चित करुन उपलब्ध करुन घ्यावी लागेल. ही बाब अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने कळवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साळूंके कैलास प्रभाकरराव, मु. पो. गोलटगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, औरंगाबाद वनभवन, उस्मानपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, वन विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सरदार सुखबिंदरसिंग चंडोक,रा.औरंगाबाद : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्रादेशिक परिवहन कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
प्रादेशिक परिवहन कार्यालय,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद - श्री. सु.दे.सुर्यवंशी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद - श्री. अ. य.बस्ते | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीसाठीच्या दि. ३१.०१.२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे एकंदर दहा बसेसच्या कर वसूलीबाबत माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीस दि. १७.०२.२०१० रोजी उपप्रादेशिक

परिवहन अधिकारी यांच्या कार्यालयातील जा.क्र.३३४३/प्रापका/औ.बाद/१० अन्वये पाठविलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाली नाही, असे नमूद केले आहे. आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०२.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. भविष्यात त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक प्रथम अपिलासंदर्भात अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन मुदतीत सुनावणी घेणे आवश्यक राहील, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१७.०२.२०१० रोजी पाठविलेल्या माहितीची एक प्रत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल. त्याचबरोबर यासंदर्भात आजची सद्यस्थिती - जसे नोंदणी व कर वसूली इ.- माहितीही पाठवावी लागेल. ही कार्यवाही तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी लागेल.

अत: प्रकरण निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस यापूर्वी पाठविलेल्या माहितीसह प्रकरणातील सद्यपरिस्थितीची माहितीही अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सरदार सुखवीरसिंग चंडोक, रा.रत्नदिप अपार्टमेंट,प्लॉट नं.१, उस्मानपुरा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नामदेव बाबुराव बोराडे, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,रांजणगाव,ता.बदनापूर,जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),बदनापूर,जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत रांजणगाव, ता.बदनापूर, जि.जालना | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर,जि.जालना | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे दोन मुद्यांद्वारे मागितलेली मागितली, त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करण्यात येऊन माहिती पाठविण्याकरिता ₹३५४/- शुल्काचा भरणा करावा, असे अपिलार्थीस दि. २४.०२.२०१० रोजीच्या पत्राने अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे कळविण्यात आले आहे. त्याबाबतची पोस्टाची पावती आयोगास सादर केली. अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांनी दि. १६.०४.२०१० रोजी सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) नुसार अपिलार्थीस माहितीकरिता शुल्क भरण्याचे विहित मुदतीत कळविले असल्याकारणाने जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निकाली काढले. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत, असेही त्यांनी पुढे आयोगास अवगत केले.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असून विहित मुदतीत त्यांनी कळविलेले असून अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा न केल्याने त्यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही, असे उपलब्ध कागदपत्रांवरुनही दिसून येत आहे. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत. त्यामुळे त्यांना शुल्काचा भरणा करणे आवश्यक होते. याकरिता आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस या शुल्काचा भरणा करावा व अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यास तदनंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर प्रकरण आयोगाच्या स्तरावर बंद करण्यात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नामदेव बाबुराव बोराडे,गणेश ज्वेलर्स,टी.व्ही.सेंटर,टी.व्ही.सेंटर, एन-११,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत रांजणगाव, ता.बदनापूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जालिंदर आबाजी सोमवंशी, : अपीलकर्ता
रा.लाडगाव,ता.वैजापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,लाडगाव, ता.वैजापूर,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,पंचायत
समिती,वैजापूर,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,लाडगाव, ता.वैजापूर,जि.औरंगाबाद - श्री. आर.के.वाघ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -विस्तार अधिकारी,पंचायत समिती,वैजापूर,जि.औरंगाबाद - श्री. एच.बी.कहाते | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी आपत्ती निवारण व भारत निर्माण या दोन योजनेबद्दल माहिती मागितली आहे. तथापि या माहितीचा कालावधी नमूद केलेला नाही. तथापि या दोन योजनांपैकी आपत्ती निवारण योजना एका वर्षात राबविण्यात आली व त्यासंदर्भातील माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. भारत निर्माण योजना, २००५ पासून राबविण्यात आली आहे व या योजनेशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही व ही माहिती ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांच्याकडे उपलब्ध होऊ शकते. ही बाब त्यांनी दि. २८.०२.२०१० रोजी अपिलार्थीस कळविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, प्रथम अपिलावरील निर्णयामध्ये ही बाब नमूद केली आहे व आपत्ती निवारण कामाचा तपशील देण्यात यावा, असा निर्णय घेतला आहे. त्याबरहुकूम जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दि. ११.०३.२०१० रोजी अपिलार्थीस विनामूल्य दिली आहे व यासंदर्भातील अपिलार्थीने दिलेली पोच त्यांच्या दप्तरी दाखल केली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये अपूर्ण माहिती मिळाली आहे, असे मोघम नमूद केले आहे. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस आपत्ती निवारण कामासंदर्भातील माहिती अपिलार्थीस मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: प्रकरण निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जालिंदर आबाजी सोमवंशी, मु.पो. लाडगाव, ता.वैजापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,लाडगाव, ता. वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,पंचायत समिती,वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. इम्रान मुस्तफा पठाण, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | सहा.जन माहिती अधिकारी -श्री. ए.आर.कुंटे,निमतानदार | |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद- श्री. टी.आर.साळवे | : उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी -अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद - श्री. लि.रा.तवरेज | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या एम.आर.१०२/०६ शेतजमिनीच्या मोजणीसंदर्भाची फाईल व नकाशाची प्रत मागितली आहे. सदरची संचिका २००६ सालची असल्याकारणाने त्याचा शोध घेऊन दि. १२.०३.२०१० रोजी घेण्यात आली व ती कार्यालयातील छाननी लिपीक यांच्याकडून प्राप्त झाली. संचिकेची पाहणी केली असता, त्यामध्ये नकाशा आढळून आला नाही व नकाशाची प्रत शोध घेण्याकरिता छाननी लिपीक यांना सूचित केलेले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, संबंधित छाननी लिपीक जबाबदार असून त्यांच्याविरुध्द नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व संचिकेतील गहाळ कागदपत्रांची विशेषतः नकाशाचा शोध घेण्यात यावा. त्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. आजपर्यंत नकाशाची प्रत सापडली नाही, ही बाब जन माहिती अधिकारी यांनी मान्य केली व त्यांच्याकडे एकूण ५४ पृष्ठांची माहिती उपलब्ध असल्याचे सांगितले. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. त्यांना ही माहिती मिळाली नाही, या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस नकाशा वगळून उर्वरित उपलब्ध झालेल्या संपूर्ण माहितीच्या छायांकित प्रती विनामूल्य द्याव्या लागतील. त्याचबरोबर नकाशा अद्यापही अप्राप्त हो, त्यासंदर्भात चौकशी सुरु करण्यात आली आहे, ती चौकशी संबंधित प्राधिकरणाला पूर्ण करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

२) अपिलार्थी यांनी मागितलेल्या नकाशाच्या प्रतीसंदर्भात सुरु करण्यात आलेली चौकशी सक्षम प्राधिकरणाने त्वरित पूर्ण करणे आवश्यक आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. इम्रान मुस्तफा पठाण,द्वारा सिजाउद्दीन पटेल, मगरबी कंपाऊंड, आर.टी.ओ.समोर, जहागिरदार कॉलनी, रेल्वेस्टेशन,औरंगाबाद

२.	जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जगन्नाथ तुकाराम जगदाळे, रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक निरीक्षक भूमी अभिलेख,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जगन्नाथ तुकाराम जगदाळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद - श्री. टी.आर. साळवे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद - श्री. कि.रा.तवरेज | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीकरिता रु.५०/- शुल्क भरणा करण्याकरिता दि.१९.०२.२०१० रोजीच्या

पत्राद्वारे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. या पत्रास अपिलार्थी यांनी प्रतिसाद देऊन दि.२४.०२.२०१० रोजी रु.५०/- शुल्काचा भरणा केला. त्यानंतर अपिलार्थीस त्याचदिवशी दि. २४.०२.२०१० रोजी व्यक्तिशः माहिती देण्यात आली. अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी मान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे सादर केलेल्या प्रथम अपिलावर दि. १२.०३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी नागरिकांची सनद या माहितीची प्रत अपिलार्थीस विनामूल्य द्यावी असा निर्णय दिला. तदनंतर अपिलार्थीस दि. २०.०३.२०१० रोजी नागरिकांची सनद विनामूल्य देण्यात आली व इतर माहिती कळविली.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीची नोटीस त्यांना उशिरा मिळाली असल्यामुळे ते सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. तथापि त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

१) माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(ख)(पाच)मधील विभागासंबंधीची माहिती

२) कलम ४(एक)(ख)(सहा) या मधील प्रत्येक बाबीप्रमाणे दस्तऐवजाची वर्गवारी - ही माहिती देण्यात आली नाही.

३) नागरिकांची सनदेची सन २००७ ची प्रत दिली आहे. अद्ययावत प्रत दिली नाही - अद्ययावत प्रत द्यावी लागेल.

उपरोक्त माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' च्या व्याख्येशी सुसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस आतापर्यंत दिली नसल्यास जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य द्यावी लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय होत असलेली तीन मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जगन्नाथ तुकाराम जगदाळे, एन-११ बी-१६३/०२ हडको, टि.व्ही. सेन्टरजवळ, औरंगाबाद -४३१ ००३.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख अय्युबभाई उस्मानभाई, : अपीलकर्ता
रा.सावखेडा, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसील कार्यालय,गंगापूर,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,वैजापूर,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख अय्युबभाई उस्मानभाई | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, गंगापूर,जि.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. राजकुमार खेत्रे, अ.का. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मौजे सावखेडा येथून नवीन

शिधापत्रिकेसाठी अर्ज व चलन भरुन देखील ४० पेक्षा जास्त गरजवंतांना शिधापत्रिका अद्यापपर्यंत का मिळाली नाही व कधी मिळणार याबाबत खुलासा मागितला आहे. त्यामुळे त्यांना ही माहिती देय होत नाही. त्याचप्रमाणे ज्यावेळी गरजू नागरिकांनी शिधापत्रिकेसाठी अर्ज भरले त्यावेळी शिधापत्रिका उपलब्ध नव्हत्या. आज रोजी या नागरिकांना शिधापत्रिका वाटप झालेल्या आहेत. त्यामुळे ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे व ते ती देऊ शकतात. आज सुनावणीच्यावेळी आयोगाच्या सूचनेनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती माहिती हस्तांतरित केली व ती अपिलार्थीने स्वीकारली. अपिलार्थी यांनी या गावातील काही शिधापत्रिका मिळाल्या आहेत, असे सुनावणीच्यावेळी सांगितले. सबब पुढील कार्यवाहीची योजना अपिलार्थी स्वतंत्रपणे करु शकतात.

अत: प्रकरण निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अय्युबभाई उस्मानभाई, मु.पो.सावखेडा, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साहेबराव रामराव शिंदे, : अपीलकर्ता
रा.शिवराई,पो.बनशेंद्रा, ता.कन्नड,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय,कन्नड,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,जि.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार कन्नड,जि.औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः उपस्थित नाहीत. याची आयोगातर्फे गंभीर दखल घेण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास सांगितले की, त्यांना माहिती प्राप्त झाली आहे. तथापि अचूक माहिती पुरविण्यात आलेली नसल्यामुळे खालील मुद्यांशी संबंधित माहिती आवश्यक आहे.

१) तहसीलदार,कन्नड यांनी वापरलेल्या शासकीय वाहनाचे दि. ०१.०१.२००९ ते दि. ३१.१०.२००९ या कालावधीत माहवार झालेल्या डिझेल खर्चाचा तपशील तसेच वाहनाच्या दुरुस्तीच्या खर्चाचा तपशील.

२) तहसील कार्यालयाने पुरवठा विभागाकरिता दि. ०१.०१.२००९ ते दि. ३१.१०.२००९ या कालावधीत खाजगी किंवा शासकीय वाहन वापरले, त्यावर दुरुस्तीकरिता झालेला खर्च

वरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांना सदरची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच एक महिन्याचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: प्रकरण निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साहेबराव रामराव शिंदे,रा.शिवराई,पो.बनशेंद्रा, ता.कन्नड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कन्नड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ई. टी.काळे, : अपीलकर्ता
रा. खुपटा, ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय,सिल्लोड, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,जि. औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, सिल्लोड,जि.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. एन.आर.पाटील, तलाठी,आमसरी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,जि.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. टी.आर.ताठे, अ.का.(रा.) | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित

आहेत.अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी व्यक्तिशः अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ई.टी. काळे, रा. खुपटा, पो. मादणी, ता. सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोउ, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ईश्वर लक्ष्मण मोरे : अपीलकर्ता
रा.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ईश्वर लक्ष्मण मोरे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. आयोगाने याची गंभीर दखल घेतली आहे. सुनावणीस दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास गरजेचे वाटते. त्यामुळे

सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ईश्वर लक्ष्मण मोरे,अभिनय टेलर्स,हॉटेल न्यु दुर्गासमोर, पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रविंद्र भागाजी खरात, : अपीलकर्ता
रा.करमाड,ता.जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन),
भूसुधार विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपजिल्हाधिकारी (साप्रवि),भुसूधार विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद - डॉ. ए.बी.गव्हाणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीच्या प्रती अपिलार्थीने मागितलेल्या माहितीनुसार दि. ११.१२.२००९ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे दि. १८.१२.२००९ रोजी प्राप्त झाला व अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती दि. २१.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहे. पुन्हा दि. ०७.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०७.०९.२०१० रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती मिळाली आहे, असे दिसून आल्याच्या कारणास्तव अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: प्रकरण निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भागाजी महादू खरात,रा.मु.पो.करमाड,ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन),जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद,<br>प्लॉट नं. १३, बशीर कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. वसंत मा. निकम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी शिट नं. ४८, सिटी सर्व्हे नंबर ९६७२/१२, १३, १४, १५ तसेच ९३७९ खुली जागा व रोड ले-आऊटमधील २० फूट जागा यावर अतिक्रमण झाल्याची तक्रार केली होती याबाबत केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्राची मागणी केली आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २५-०२-२०१० रोजी कळविले व यामध्ये नमूद केले आहे की, मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, सदरचे पत्र त्यांना मिळाले नाही. अपिलार्थी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, महानगरपालिकेच्या जागेवर ५ x १७० फुटाचे अतिक्रमण झाले असल्याने याबाबत मोजणी करुन पुढील कार्यवाही व्हावी यादृष्टीने त्यांनी माहितीची मागणी केली आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. उपलब्ध कागदपत्रे पाहण्यात आली. यावरुन असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी यांच्या दिनांक २५-०२-२०१० च्या पत्रात केलेला युक्तिवाद योग्य नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या झेराक्स प्रती त्यांना देणे जरुरी होते. त्याच-प्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी सार्वजनिक उपक्रमाबाबत माहिती मागितली असल्याकारणाने माहितीच्या प्रती त्यांना देय होत आहे. प्रकरणात अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद जे कार्यालयाचे प्रमुख असून त्यांचे प्रशासकीय नियंत्रण आहे त्यांची विशेष साक्ष आयोगापुढे आवश्यक ठरत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (३) (ङ) अन्वये सदर प्रकरणी त्यांना पुढील सुनावणीच्या वेळी सर्व माहितीनिशी विशेष साक्षीकरिता आयोगापुढे उपस्थित राहावे लागेल. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन

अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे. तसेच आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी पुढील सुनावणीच्या वेळी सर्व माहितीनिशी विशेष साक्षीकरिता आयोगापुढे उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद, प्लॉट नं. १३, बशीर कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष,<br>कामधेनू सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., जाधववाडी, पो. नारेगांव, पिसादेवी रोड, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सु. वा. कुलकर्णी, अध्यक्ष, कामधेनू सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., जाधववाडी, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. वसंत मा. निकम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०२-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी कामधेनू सहकारी गृहनिर्माण संस्था व सनी सेंटर जाधववाडी संबंधीचा व तसेच रोड रुंदीकरणाबाबतची माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, त्यांच्या तीन मुद्दयांपैकी २ व ३ मुद्दयाच्या प्रती मिळाल्या आहे. मुद्दा क्रमांक १ बाबतची माहिती अद्यापपावेतो मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला की, संबंधित संचिका जुनी संचिका असल्यामुळे सापडत नाही.

आयोगापुढे उपलब्ध असलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद यावरुन असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही नगरपालिका हद्दीतील रस्त्याच्या अलाईनमेंट संदर्भात असून पूर्वीच्या अलाईनमेंटमध्ये आता बदल झाला आहे व दोन्ही बाजूंना रुंदीकरणासाठी सारखीच जागा न घेता एका बाजूलाच रुंदीकरण झाले आहे. याबाबत विचाराधीन संस्थेला बांधकामास मंजूरी मिळाली आहे व त्यानुसार त्यांनी बांधकाम केले आहे. सन २००४ मध्ये रस्ते रुंदीकरण प्रस्ताव आला आहे. ती कागदपत्रे अपिलार्थीस मिळणे अभिप्रेत आहे. तरी खालील कागदपत्रे विशेष बाब म्हणून अपिलार्थी यांना देण्याचे जन माहिती अधिका-यास आयोग निदेश देत आहे.

१. सन १९९४ च्या वेळेची रस्त्याच्या (Position) संदर्भातील कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती.

२. सन २००० मध्ये रस्ता रुंदीकरण करताना मंजूर केलेल्या नकाशाच्या प्रती, यासंदर्भातील टिपणी व पत्रव्यवहाराच्या झेरॉक्स प्रती.

मुद्दा क्रमांक १ बाबत संपूर्ण छाननी आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी विशेष पथक लावून करुन घ्यावी लागेल व नस्ती सापडली नाही तर संबधितावर त्याबाबत जबाबदारी निश्चित करावी लागेल असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीच्या व नकाशाच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवाव्यात.

२. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे गहाळ झालेल्या नस्तीचा शोध विशेष पथकामार्फत करावा व नस्ती सापडली नाही तर चौकशी करुन संबंधिताविरुध्द जबाबदारी निश्चित करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अध्यक्ष, कामधेनू सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., जाधववाडी, पो. नारेगांव, पिसादेवी रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे, : अपीलकर्ता
'तुळजाई' ४१, श्रीनगर कॉलनी, संत एकनाथ हॉस्पिटल
समोर, उल्कानगरी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद<br>- श्री. वसंत मा. निकम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका,<br>औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी आयोगापुढे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक १३-०१-२०१० रोजीच्या अर्जासंदर्भात योग्य ती माहिती पुरवू शकले नाहीत. तसेच अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना पाहिजे ती माहिती मिळाली नाही. या पार्श्वभूमीवर प्रकरणात दोन्ही बाजूंना आपली बाजू मांडण्यासाठी तयारीसाठी वेळ देण्यात येत असून सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे, 'तुळजाई' ४१, श्रीनगर कॉलनी, संत एकनाथ हॉस्पिटल समोर, उल्कानगरी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राजकुमार अग्रवाल,<br>भागेदार सुविधा डेव्हलपर्स, पी. टी. कंपाऊंड, मोंढा नाका, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सिडको कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सिडको कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - श्री. शैलेंद्र मलारा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ नियोजनकार (न. श.), सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद - श्री. ज्ञानेश्वर रामदास भदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रशासक, सिडको, नवीन औरंगाबाद - श्री. पांडुरंग कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संचिका अवलोकनार्थ देण्यात आली होती व नंतर रुपये ५२० चा भरणा करण्यास कळविण्यात आले होते. यावर अपिलार्थी यांनी त्यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी करुन माहितीपोटी त्यांना आवश्यक असलेल्या नकाशाच्या प्रतिसाठी रुपये ५६ भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेतली आहे. यावेळी त्यांना संपूर्ण माहिती दाखविण्यात आली आहे जी अपिलार्थी यांनी पाहिली आहे. अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहितीबाबत, 'माहिती' या संज्ञाच्या व्याख्येमध्ये जी माहिती येते ती माहिती शुल्काचा भरणा करुन त्यांना देण्यात आली आहे. तसेच संपूर्ण माहिती पाहणीसाठी त्यांना देण्यात आली आहे. माहितीचा तपशील तयार करुन देणे हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत नसल्याने ती देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे प्रथम अपील दिनांक २४-०२-२०१० रोजी निकाली काढले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन ही बाब स्पष्ट होत आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार अग्रवाल, भागेदार सुविधा डेव्हलपर्स, पी. टी. कंपाऊंड, मोंढा नाका, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ नियोजनकार (न. श.), सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक, सिडको, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण रघुनाथ गायके, : अपीलकर्ता
मु. पो. रेल, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड,
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अरुण रघुनाथ गायके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. पी. ए. दाभाडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बि-हाडे एस. एस., विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-०३-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००७ ते २००९ या कालावधीतील कन्नड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या नालासफाई कामासाठी करण्यात आलेल्या खर्चाची छायांकीत प्रत व अंदाजपत्रक याची माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कन्नड तालुक्यातील सर्व (१३७) ग्रामपंचायतीची असून प्रत्येक ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक हे जन माहिती अधिकारी आहेत. अपिलार्थी यांनी ही माहिती त्यांच्याकडून घेणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे ग्रामपंचायतकडे स्वतंत्र अर्ज करावा असे अपिलार्थीस दिनांक २३-१२-२००९ रोजी विहीत मुदतीत कळविले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांचा दिनांक २२-१०-२००९ चा मूळ अर्ज दिनांक २१-१२-२००९ रोजी कार्यालयात दाखल केला आहे असे सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक ०५-०३-२०१० रोजी निर्णय देताना अपिलार्थीने ग्रामपंचायतकडून स्वतंत्र अर्ज करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळवून अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, सर्व ग्रामपंचायतीच्या अपेक्षित खर्चाची माहिती व उपलब्ध करुन दिलेला निधी व झालेला खर्च ग्रामपंचायतनिहाय गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालयात उपलब्ध असू शकतो व तो त्यांना देण्यात यावा.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या प्रत्येक ग्रामपंचायत बाबत वर नमूद केलेली माहिती विनामूल्य नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस द्यावी लागेल. अंदाजपत्रक व खर्चाबाबतच्या छायांकीत प्रती करीता अपिलार्थी यांना त्यांना आवश्यक वाटत असेल त्या ग्रामपंचायतीकडे माहिती अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी लागेल.

या पाश्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली सन २००७ ते २००९ च्या या कालावधीच्या सर्व ग्रामपंचायतीच्या अपेक्षित खर्चाची व उपलब्ध करुन दिलेला निधी व झालेला खर्च याबाबतची

ग्रामपंचायतनिहाय माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रघुनाथ गायके, मु. पो. रेल, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजाराम केशव शेळके, : अपीलकर्ता
मु. माटेगांव, पो. कसबखेडा, तालुका कन्नड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, माटेगांव, तालुका कन्नड,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड,
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजाराम केशव शेळके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, माटेगांव, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. विलास सुरतान पाडवी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. डी. एस. साळूंके | | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. प्रकाश दाभाडे | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व तत्कालीन आणि सध्याचे जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी शेळके वाड्यातील सहान जागेबद्दल सन १९८० ते २००९ या वर्षाची माहिती मागितली आहे. या जागेमध्ये अपिलार्थीच्या तीन भावडांची नावे आहेत असे नमुना नं. ८ वरुन आढळून येत आहे. अपिलार्थी यांना ही माहिती द्यावयाची किंवा कसे हा संभ्रम जन माहिती अधिकारी यांना निर्माण झाला व त्यामुळे त्यांनी माहिती दिली नाही तथापि आयोगाचे मत असे आहे की, या प्रकरणात अपिलार्थी यांनी मागितलेल्या जागेत त्यांचे नाव असो किंवा नसो त्याची कागदपत्रे त्यांना द्यावे लागतील. त्यानुसार आज रोजी ही माहिती आयोगाने सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीस देण्यात आली व ती अपिलार्थीने स्विकारली. या कागदपत्राची पाहणी अपिलार्थीने करावी व त्यात काही माहिती अपूर्ण असल्यास तसे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावे व यानंतर पंधरा दिवसाच्या आत मूळ अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस माहिती पुरवावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाराम केशव शेळके, मु. माटेगांव, पो. कसबखेडा, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, माटेगांव, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मणराव भिकाजी आव्हाड, रा. रांजणगाव शेणपुंजी, पो. घाणेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिवूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिवूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद - श्री. आर. बी. निकम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद - श्री. एस. डी. चव्हाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये सन २००१ ते दिनांक २३-१२-२००९ या कालावधीतील अठरा मुद्दयांवरील मोठ्या प्रमाणात व्यापक अशी माहिती मागितली आहे. माहितीची व्याप्ती विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०१-२००९ रोजी कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्रांची पाहणी करावी असे दिनांक १५-०१-२०१० रोजी नोंदणीकृत टपालाने विहित मुदतीत कळविले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर यांनी दिनांक ११-०३-२०१० रोजी व नंतर १९-०३-२०१० ला सुनावणी घेतली. सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये अपिलार्थीस पुन्हा एकदा माहितीची पाहणीची संधी द्यावी असा निर्णय दिला. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०३-२०१० रोजी नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस कागदपत्रे निरीक्षणासाठी कार्यालयात उपस्थित राहावे असे कळविले तथापि अपिलार्थी उपस्थित झाले नाहीत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन माहितीची व्याप्ती विचारात घेता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) अन्वये माहिती पाहणीकरिता अपिलार्थीस दोनदा संधी उपलब्ध करुन दिली आहे असे आढळून येत आहे. त्यामुळे आयोगाच्या स्तरावर प्रकरण बंद करण्यात यावे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मणराव भिकाजी आव्हाड, रा. रांजणगाव शेणपुंजी, पो. घाणेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिवूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महेंद्र ठमाजी साळवे | : | अपीलकर्ता |
| | राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २३/१, हर्सूल, औरंगाबाद | | |
| २ | बी. आर. पाटील, | | |
| | राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २३/१, हर्सूल, औरंगाबाद | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | पंचायत समिती कार्यालय, जालना | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | पंचायत समिती कार्यालय, जालना | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, | : | अनुपस्थित |
| | पंचायत समिती कार्यालय, जालना | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, | : | अनुपस्थित |
| | पंचायत समिती कार्यालय, जालना | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महेंद्र ठमाजी साळवे राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २३/१, हर्सूल, औरंगाबाद.

२. बी. आर. पाटील, राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २३/१, हर्सूल, औरंगाबाद.

३. जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शे. लईक अहमेद शे. शफियोद्दीन,<br>गल्ली नं. ४, आसेफिया कॉलनी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>वक्फ बोर्ड कार्यालय, पानचक्की, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>वक्फ बोर्ड कार्यालय, पानचक्की, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>वक्फ बोर्ड कार्यालय, पानचक्की, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>वक्फ बोर्ड कार्यालय, पानचक्की, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळालेली आहे परंतु ती अपुरी मिळाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी, वक्फ बोर्ड कार्यालय, पानचक्की, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी, वक्फ बोर्ड कार्यालय, पानचक्की, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी, वक्फ बोर्ड कार्यालय, पानचक्की, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शे. लईक अहमेद शे. शफियोद्दीन, गल्ली नं. ४, आसेफिया कॉलनी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, वक्फ बोर्ड कार्यालय, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, वक्फ बोर्ड कार्यालय, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख हबीब पाशा पि. गुलाम रसूल, : अपीलकर्ता
घर नं. १-१६-३२, जुना बाजार, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
पानचक्की, औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८५
२ सुनावणीची तारीख दि. ०५-०५-२०११
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी : अनुपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी, : अनुपस्थित
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
पानचक्की, औरंगाबाद

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. २४-१२-२००९
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख १३-०१-२०१०
६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०२-२०१०
७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख
८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३१-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळालेली आहे परंतु ती अपुरी मिळाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख हबीब पाशा पि. गुलाम रसूल, घर नं. १-१६-३२, जुना बाजार, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाळासाहेब संपतराव म्हस्के, रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता तथा दक्षता पथक प्रमुख,<br>म.ग्रा.रो.ह.यो.,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता तथा दक्षता पथक प्रमुख,म.ग्रा.रो.ह.यो.जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद - श्री.ए.एस.देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, दि. २१.१२.२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती दुसऱ्या एका अशाप्रकारच्या माहितीच्या

अर्जासंदर्भात दि. ०८.१२.२००९ रोजी अपिलार्थीस दिलेली आहे. यासंदर्भात अपील क्र.२२५४/०९ मध्ये आयोगापुढे दि. ०१.०४.२०११ रोजीची सुनावणी झाली असून आयोगाने निर्णय पारीत केला आहे. अपिलार्थी ज्या चौकशी अहवालाच्या प्रती मागत आहेत, त्या प्रकरणाची चौकशी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत झालेली नाही, त्यामुळे तो अहवाल त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी याविषयी दि. ०४.०१.२०१०, ०३.१०.२००९ व ०८.१२.२००९ रोजी कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २६.०२.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना मागितलेल्या माहितीसंदर्भात नेमकी कोणती कार्यवाही झाली किंवा झाली नाही, ही बाब कळविण्यात यावी. त्याप्रमाणे अपिलार्थीस दि. ११.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर अपील निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळासाहेब म्हस्के, रा.राहुलनगर, रेल्वेस्टेशनजवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, दक्षता पथक प्रमुख, म.रा.ग्रा. रो.ह.यो.जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रविंद्र भागाजी खरात,<br>रा.करमाड,ता.जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन),<br>भूसुधार विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपजिल्हाधिकारी (साप्रवि),भुसूधार विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद - डॉ. ए.बी.गव्हाणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती (एकूण ४० पृष्ठे) दि. २२.०१.२०१० रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस पाठविण्यात आली आहेत. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी प्रथम अपिलावर निर्णय घेतल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १३.०१.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१३.०१.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र भागाजी खरात,मु.पो.करमाड, ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (साप्रवि),भुसूधार विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप कचरदास नावंदर, : अपीलकर्ता
रा.गंगापूर,ता.जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, गंगापूर, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,व जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप कचरदास नावंदर,रा.राजीव गांधी चौक,गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शकिल शेख हुसेन खलिफा, : अपीलकर्ता
रा.पैठण,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,पैठण,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,पैठण,जि.औरंगाबाद- श्री. आर.आर.जयस्वाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद- प्रतिनिधी- श्री. व्ही.जी. देशमुख,उपकार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि. २०.११.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीपोटी (एकूण १४९० पृष्ठे) रु. २९८२/- रकमेचा भरणा करण्यात यावा, नंतर माहिती देण्यात येईल, असे कळविले आहे. तथापि अपिलार्थीने प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २४.०२.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना शुल्क भरणा करण्याकरिता कळविले असल्याकारणाने व उपविभागाकडून माहिती देण्याचा प्रयत्न झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे हे अपील फेटाळण्यात येत आहे. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांचा पत्रव्यवहार मिळाला आहे, असे वेळोवेळी कळविले आहे व त्यामध्ये त्यांना माहितीचा एक संच विनामूल्य देण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांचे राज्य माहिती आयोगास लिहिलेले दि. ३०.०४.२०११ रोजी एक पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे की, त्यांना माहिती प्राप्त झाली असून त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे.

अत: प्रकरण निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शकिल शेख हुसेन खलिफा,नेहरु चौक,पैठण,ता.पैठण,जि.औरंगाबाद -४३११०७

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग,पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण एकनाथ औटे,<br>रा.पैठण,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विशेष अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद-श्री.ए.एस.साळवे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बिरादार व्ही.वाय, सहा.मुख्य अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | २४.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | १५.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी , जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये पैठण तालुक्यातील रस्त्याच्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत चौकशी अहवालाची संपूर्ण साक्षांकित प्रत व पुढे केलेल्या कार्यवाहीच्या प्रती मागितल्या आहेत. याबाबत चौकशीची कार्यवाही प्रगतीपथावर असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम ८ (ज) नुसार अपिलार्थीस माहिती देण्याचे दि. २४.०२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे नाकारले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीच्य प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि. १५.०४२०१० रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयास सहमती दर्शविली आहे. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. आजही अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगाने पृच्छा केली असता जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, सदर प्रकरणाच्या चौकशी प्रक्रिया अजूनही सुरु आहे व कारणे दाखवा नोटीस तयार करुन शासनाकडे पाठविण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी चौकशी प्रक्रिया प्रगतीपथावर असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील नमूद कलम ८(ज) नुसार अपिलार्थीस देय होत नाही, हा घेतलेला निर्णय आयोगास योग्य वाटत आहे.

अत: प्रकरण निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण एकनाथ औटे, माऊली भोजनालय,माहेश्वरी धर्मशाळा,उद्यान

रोड,पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मग्गीरवार जनार्दन वैजीनाथ<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लातूर पाटबंधारे विभाग, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास<br>प्राधिकरण,बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मग्गीरवार जनार्दन वैजीनाथ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता,लातूर पाटबंधारे विभाग,लातूर - श्री. दे.दि.ढगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,लातूर पाटबंधारे विभाग,लातूर - श्री. मो.सि.बदरखे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या घरबांधणी अग्रीम वसूलीशी संबंधित कागदपत्रांची माहिती मागितली आहे. यापैकी ३७ महिन्यात कपात केलेली रक्कम ₹१३,५७९/- चा माहवार तक्ता तयार करुन देण्यात आला. त्यामध्ये ट्रेझरी व्हाऊचर नंबर देण्यात आलेले नाहीत.या माहितीची कोषागार कार्यालयास मागणी केली. तथापि त्या कार्यालयाने ही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. ही माहिती त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही प्राप्त झाली नाही. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांचे नावे शासनाकडून मंजूर झालेले घरबांधणी अग्रीम सोसायटीस अदा करण्यात आले आहे. या अग्रीमाची वसूली त्यांच्या वेतनातून दरमहा झालेली असून यातील रक्कम ₹१३,५७९/- (एकूण ३७ महिने) चुकीच्या लेखाशीर्षाखाली जमा झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे अपिलार्थीस यासंदर्भातील ट्रेझरी व्हाऊचर क्रमांकाची आवश्यकता आहे. दि. १८.०१.२०१० रोजीच्या पत्रान्वये संबंधित गृहनिर्माण संस्थेने अपिलार्थीच्या ₹१३,५७९/- कर्जवसूलीच्या रकमेचे संस्थेच्या अभिलेखात समायोजन करण्यात आले असल्याचे कळविले आहे. या पत्राची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. आयोगाने असे सूचित केले. की,एक विशेष बाब म्हणून या पत्राचा तसेच कार्यालयीन अभिलेखांचा संदर्भ देऊन महालेखापाल,नागपूर यांचेकडे पत्रव्यवहार करुन त्याचा हवाला देऊन रक्कम चुकून दुसऱ्या लेखाशीर्षाखाली जमा झाल्यामुळे कार्यालयाचे प्रमाणपत्र देऊन योग्य लेखाशीर्षाखाली नोंद घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह ताळमेळ करुन घ्यावा लागेल व विशेष बाब म्हणून या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. त्याचप्रमाणे ट्रेझरी व्हाऊचर क्रमांकाचाही पुन्हा शोध घेऊन त्यासंदर्भातील माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. यासाठी त्या कालावधीमध्ये अपिलार्थी यांच्याबरोबर ज्या इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकामध्ये उल्लेख असेल, त्या कर्मचाऱ्यांच्या अभिलेखावरील ट्रेझरी व्हाऊचर क्रमांक द्यावा लागेल.त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये घरबांधणी अग्रीम रजिस्टर ठेवण्यात आले असल्यास त्याच्या अपिलार्थीशी संबंधित पृष्ठांच्या छायाप्रती द्याव्या लागतील.

या सर्व पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीन महिन्याच्या आत संपूर्ण माहिती हस्तपोच देय टपालाद्वारे पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मग्गीरवार जनार्दन वैजीनाथ,द्वारा जायकवाडी प्रकल्प मंडळ,स्नेहनगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,लातूर पाटबंधारे विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लातूर पाटबंधारे विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामनाथ कडुजी इथापे, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नवीन
दहिफळ,ता.शेवगाव, जि.अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हा परिषद, अहमदनगर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | तत्कालीन जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक, ग्रामपंचायत, दहिफळ नवे, ता.शेवगाव, जि.अहमदनगर- श्री.जी.बी.चेमटे | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक, ग्रामपंचायत, दहिफळ नवे, ता.शेवगाव, जि.अहमदनगर- श्री.जी.बी.चेमटे यांचे वकील श्री. व्ही.ए.ढाकणे | : | उपस्थित |
| ३.४ | विद्यमान जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक, ग्रामपंचायत, दहिफळ नवे, ता.शेवगाव,जि.अहमदनगर- श्री.पवार डी.एस | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी - विस्तारअधिकारी (पं.),पंचायत समिती, शेवगाव,जि.अहमदनगर - श्री.के.व्ही.इंगळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.०१.२०१० |

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९.०४.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी त्यांच्या विधिज्ञासह व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीकरिता दि. १३.१२.२००९ रोजी अपिलार्थीस माहितीपोटी रु. २८२/- इतके शुल्क भरण्याकरिता कळविले आहे. अपिलार्थी यांनी या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केलेला नाही. यांचे वकील श्री.व्ही. ए. ढाकणे यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, दि. २४.१०.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दि. ०९.०१.२०१० रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली. दि. २७.०१.२०१० रोजी त्यांना मिळाली आहे. त्याची पोच दप्तरी दाखल आहे. अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती देण्यास काही कालावधी लागला. याकरिता अपिलार्थी यांच्या वकीलाने दोन कारणे पुढे केली. अपिलार्थी यांनी सन २००५-२००९ या कालावधीची माहिती मागितली आहे, ती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला व जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यावेळी दोन गावांचा कार्यभार होता. माहिती उशिरा पुरविण्यामागे त्यांची कोणतीही असद्‌भावना नव्हती. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती विहित मुदतीनंतर पाठविलेली आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केल्याचे आढळून आले नाही, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेतला नाही.

आज अपिलार्थी उपस्थित नाहीत. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेल्या माहिती एक संच आज उपलब्ध आहे. तो अपिलार्थीस पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावा लागेल.

अत: प्रकरण निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहिती एक संच अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावा

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामनाथ कडुजी इथापे,भगतसिंगनगर हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं. सी-२/९, हर्सूल, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, दहिफळ नवे, ता.शेवगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तारअधिकारी (पं.),पंचायत समिती, शेवगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक सर्जेराव देशमुख, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,चांदा (खु), ता.कर्जत,जि.अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, कर्जत,
जि.अहमदनगर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत चांदा (खु.), ता.कर्जत,जि.अहमदनगर- श्री. मुळे ए.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती,कर्जत,जि.अहमदनगर-श्री. काकडे दे.दा. | : | उपस्थित |
| ३.४ | गट विकास अधिकारी, श्री. अशोक द.गायकवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कर्जत,जि.अहमदनगर उपस्थित आहेत.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना प्राप्त झाला नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १५.०३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यांच्या प्रथम अपिलावर तात्काळ माहिती देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला व त्याची प्रत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस देण्यात आली. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये ही बाब नमूद केली आहे. तथापि त्यांना फेरफार ठरावाची प्रत दिली नाही, असे नमूद केले आहे. परंतु हा मुद्दा अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीमध्ये दिसून येत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक सर्जेराव देशमुख,१५, स्वानंदनगर,न्यु श्रेयनगर,औरंगाबाद - ४३१ ००५

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चांदा (खु.), ता.कर्जत, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती कर्जत, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सतीश आनंदराव मुंडे,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>श्री ओंकारनाथ मालपानी विधी<br>महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, श्री ओंकारनाथ मालपानी विधी<br>महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | अधीक्षक, श्री ओंकारनाथ मालपानी विधी महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर- श्री. बी.जी.नाईकवाडी | : | उपस्थित |
| ३.३ | प्राचार्य, श्री ओंकारनाथ मालपानी विधी महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अधीक्षक श्री ओंकारनाथ मालपानी विधी महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगरचे उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी अधीक्षक,श्री ओंकारनाथ मालपानी विधी महाविद्यालय, संगमनेर, जि.अहमदनगर श्री. बी. जी.नाईकवाडी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांचे विधी महाविद्यालय कायमस्वरुपी विनाअनुदानित आहे. त्यास शासनाकडून कोणतेही आर्थिक सहाय्य मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या महाविद्यालयास माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही. अपिलार्थी त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागत आहेत. तरीही त्यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा आढावा घेतला असून या माहितीकरिता रु.५६७०/- पृष्ठांकरिता रु.११,३४०/- व त्यांना माहितीपोटी रु. २५,५१५/- इतक्या शुल्काची रक्कम जमा करण्याकरिता कळविलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिलेला नाही.

या पार्श्वभूमीवर आयोगाच्यास्तरावर अपील बंद करण्यात येऊन आयोगातर्फे आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुंडे सतिश आनंदराव,घर नं.५८५, सर्व्हे नं.६८, मुंडे निवास,जयभवानी नगर,एन-४, सिडको,औरंगाबाद

२. अधीक्षक, श्री ओंकारनाथ मालपानी विधी महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उस्मानशाह ई.अन्वीकर, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
संशोधन अधिकारी तथा
सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी
प्रमाणपत्र समिती क्र.१,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय समाज कल्याण अधिकारी (जा.प्र.प.सं.),
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
क्र.१,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उस्मानशाह ई.अन्वीकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी प्रमाणपत्र समिती क्र.१,औरंगाबाद- कु. छाया के. कुलाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय समाज कल्याण अधिकारी (जा.प्र.प.सं.),विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद - श्री. बी.व्ही.शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | - |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०.०४.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे 'छप्परबंद वि.जा' या जातीच्या वैधता प्रमाणपत्राबाबत माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे जातनिहाय उमेदवारांचे रेकॉर्ड ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे छप्परबंद जातीनिहाय उमेदवारांच्या नावाची माहिती देणे शक्य नाही. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती असल्यामुळे त्यांची संमती घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपण मागितलेली माहिती सन २०००-०९ या कालावधीतील उमेदवारांचे नाव पत्त्यासह देण्यात यावा म्हणजे माहिती देणे सोयीचे होईल, असे कळविलेले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १५.०२.२०१० रोजी सुनावणी घेतली व त्यामध्ये निर्णय दिला आहे की, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाकडून संमती प्राप्त करावी व अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीची तरतुद मुख्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन तरतुद उपलब्ध झाल्यानंतर अपिलार्थीस ६० दिवसांच्या आत माहिती देण्यात यावी. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये दोन त्रयस्थ व्यक्तींची माहिती देण्याचे कळविले आहे. त्यापैकी एका व्यक्तीस विचारणा केली असता त्यांनी त्यांच्यासंदर्भातील माहिती वैयक्तिक असल्याकारणाने त्यांची माहिती देण्यास आक्षेप घेतला आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास असे सांगितले की छप्परबंद या जातीच्या वैध प्रमाणपत्राच्या सर्व अर्जदाराची माहिती त्यांना आवश्यक आहे व या माहितीमध्ये वैयक्तिक अशा माहितीचा समावेश होत नाही. या माहितीचा वापर काही गरजू छप्परबंद उमेदवार करु शकतील.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आयोगाने असे सूचित केले की, दोनही बाजूंनी छप्परबंद वि.जा.वैध प्रमाणपत्राकरिता विहित मापदंडाप्रमाणे किमान आवश्यक कागदपत्रांची यादी दोनही बाजूंनी आयोगापुढे सादर करावी. त्यावर अवलंबून त्रयस्थ पक्षाच्या वैयक्तिक बाबीत हस्तक्षेप होणार नाही, हे पाहून निर्णय घेणे योग्य ठरेल. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत असून पुढील सुनावणीस दोनही बाजूंकडून या बाबीवर आयोगापुढे बाजू मांडण्यासाठी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठया प्रमाणात असल्याचे दिसून आले असल्यामुळे पुढील सुनावणीच्यावेळी त्यांना मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी करण्यासाठी स्वेच्छेने विचार करावा लागेल.तसेच माहिती उघड केल्याने साध्य होणाऱ्या व्यापक जनहिताबाबत बाजू मांडावी लागेल,

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उस्मानशाह इब्राहिमशाह अन्वीकर, उपाध्यक्ष, मुस्लीम छप्परबंद शाह सामाजिक विकास मंडळ, गल्ली नं.२०, इंदिरानगर,बायजीपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी प्रमाणपत्र समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुनिल दत्तात्रय शेटे,<br>रा. बिडकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बिडकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बिडकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. भिसे डी. टी., विस्तार अधिकारी (पं.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०३-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल दत्तात्रय शेटे, रा. बिडकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बिडकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. निवृत्ती दादा वाघ, : अपीलकर्ता
रा. थेरगांव, पो. थेरगांव, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, थेरगांव, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, थेरगांव, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. के. बी. गव्हाणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. भिसे डी. टी., विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०३-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मौजे थेरगांव, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद येथील नागरिक आप्पाजी बापुजी यांच्या नांवे असलेल्या जागेबद्दल दिनांक २६-११-२००९ च्या अर्जान्वये माहिती मागितली आहे. परंतु त्यांचे नावे जागा रेकॉर्डला नसल्यामुळे अशी माहिती उपलब्ध नाही. अपिलार्थी स्वतः माहिती घेणार होते. तथापि माहिती हस्तगत करण्यासाठी ते व्यक्तिशः न आल्याने दिनांक २३-०२-२००९ रोजी ही माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आली ती अपिलार्थीने स्विकारली नाही. अपिलार्थी यांनी पाकीट घेण्यास नकार दिला असा पोस्टाचा शेरा आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण यांनी दिनांक २४-०२-२०१० रोजी सुनावणी घेतली आहे. या सुनावणीत याची नोंद घेण्यात आली. सुनावणीनंतर अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती पुरवावी असा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४-०५-२०१० रोजी याबाबत स्पीड पोस्टाने अपिलार्थीस माहिती पाठविली आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, आप्पाजी बापुजी वाघ यांचे नाव रेकॉर्डला नसल्यामुळे माहिती उपलब्ध नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्याचा प्रयत्न केला असल्याचे आयोगास आढळते. या सर्व बाबी विचारात घेता प्रकरण आयोगाच्या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०५-२०११**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निवृत्ती दादा वाघ, रा. थेरगांव, पो. थेरगांव, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, थेरगांव, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळगीर गंगागीर गिरी, : अपीलकर्ता
रा.सावरगांव, पो.उंबरखेड, तालुका कन्नड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- श्रीमती जोहरा देशमुख | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०४-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठाने गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कन्नड यांच्याविरुध्द दिनांक ०१-०१-२००९ रोजी शिस्तभंगाचे आदेश दिले आहेत याबाबतच्या सद्यस्थितीची माहिती मागितली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १५-०४-२०१० रोजी सुनावणी घेतली. सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. त्यावेळी निर्णय घेतला आहे की, संबंधित शाखेकडून या प्रकरणी माहिती अपिलार्थीस देण्यात यावी. त्यानुसार अपिलार्थी यांना दिनांक ०४-०६-२०१० रोजी जन माहिती अधिका-याने सद्यस्थिती कळविली आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळगीर गंगागीर गिरी, रा. सावरगांव, पो. उंबरखेड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अर्जून साहेबराव नवपुते, : अपीलकर्ता
मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पंचायत समिती कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, औरंगाबाद - श्री. आर. व्ही. सिरसाळकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बि-हाडे एस. एस., विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दिनांक १८-०१-२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यासाठी रुपये १७८ इतक्या शुल्काचा भरणा करावा असे दिनांक ०८-०२-२०१० रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविले आहे. अपिलार्थी यांना मुद्दा क्रमांक ४ बाबतच्या माहितीची प्रत दिनांक ०८-०२-२०१० रोजी देण्यात आली आहे व उर्वरीत माहितीच्या छायांकीत प्रतीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर दिनांक २०-०२-२०१० च्या पत्रान्वये मुद्दा क्रमांक १ ते ३ ची माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थीने एकूण ९६ पृष्ठांची माहिती दिनांक २४-०२-२०१० रोजी स्विकारली असून त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी दाखल आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे आढळून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०६-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अर्जून साहेबराव नवपुते, मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, औरंगाबाद या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन),

जिल्हा परिषद, औरंगाबाद या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुधाकर उत्तमराव वाघमारे, : अपीलकर्ता
मु. रामराई, पो. वाळूज, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत, जोगेश्वरी,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत, जोगेश्वरी,<br>तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद<br>- श्री. एस. एन. रोहोकले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,<br>तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. एल. जे. गव्हाणे, विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०२-२०१० |

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०४-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ३०-०४-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये एकूण सन २००१ ते दिनांक ३१-०३-२००९ या कालावधीची ११ मुद्दयांवर सुमारे दहा वर्षापर्यंतची विविध मुद्दयांवर विस्तृत माहिती मागितली आहे. माहितीची व्याप्ती मोठी असल्यामुळे ती एकत्र करण्यास वेळ लागला. ही बाब अपिलार्थीस दिनांक २६-०२-२०१० रोजी कळविण्यात आली आहे. सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती एकत्र करुन एकूण ५१६ पृष्ठांच्या झेरॉक्स प्रती दिनांक १६-०६-२०१० रोजी अपिलार्थीस विनामूल्य व्यक्तिशः दिल्या आहेत. त्याची पोच अपिलार्थीने त्यांना दिलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत झाले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुधाकर उत्तमराव वाघमारे, मु. रामराई, पो. वाळूज, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत, जोगेश्वरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, : अपीलकर्ता
व्दारा, एम. ए. मजीद, ४०, न्यू एस. टी. कॉलनी, कटकट गेट, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापिका, जियाउल उलूम गर्ल्स हायस्कूल, बुड्डीलेन, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५०१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, जिया उल उलूम गर्ल्स हायस्कूल, बुड्डीलेन, औरंगाबाद - श्रीमती शेख सलमा | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- श्री. पी. बी. चव्हाण | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०१-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०८-०२-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

या प्रकरणात राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठाने यापूर्वी दिनांक ०३-०८-२००९ रोजी सुनावणी घेऊन प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे पुन्हा सुनावणी घेण्यासाठी परत पाठविले होते. त्याबाबत जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर पुन्हा दिनांक ०५-०२-२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला आहे. या निर्णयानुसार अपिलार्थी यांना सर्व माहिती देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे शाळेच्या कार्यालयाने उर्वरीत माहितीच्या अभिलेख्याची पहाणी दिलेली आहे असे आढळून येत आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली आहे. अपिलार्थी यांना रुपये २६०० परत करावे असा प्रथम अपिलीय अधिका-याने घेतलेला निर्णय आयोग मान्य करत आहे. निर्णयात नमूद केल्याप्रमाणे आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी रुपये २६०० चा धनादेश आयोगासमोर अपिलार्थीस दिला आणि अपिलार्थीने तो स्विकारला. या सर्व बाबी विचारात घेता सदरचे प्रकरण आयोगाच्या स्तरावर बंद करण्यात यावे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, व्दारा, एम. ए. मजीद, ४०, न्यू एस. टी. कॉलनी,

कटकट गेट, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, जिया उल उलूम गर्ल्स हायस्कूल, बुड्डीलेन, औरंगाबाद या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत कि. भालेराव, : अपीलकर्ता
व्दारा, ॲड रमेश भालेराव,
सिडको, एन-९, फ्लॅट क्रमांक आर-२६/एम-१३/५१, म्हाडा कॉलनी, रायगड नगर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मारुळ, तालुका यावल, जिल्हा जळगांव

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, यावल, तालुका यावल, जिल्हा जळगांव

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५०२

२ सुनावणीची तारीख दि. ०६-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. चंद्रकांत कि. भालेराव : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मारुळ, तालुका यावल, जिल्हा जळगांव - श्री. एम. बी. बा-हे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यावल,
तालुका यावल, जिल्हा जळगांव
- प्रतिनिधी - श्री. यु. पी. पाटणकर, विस्तार अधिकारी (पं.)

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०८-०१-२०१०

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०८-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०१-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीबाबत त्यांना यापूर्वी कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, याबाबत त्यांना माहिती मिळाली आहे परंतु त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भातील माहिती मिळाली नाही. यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, मिळकत क्रमांक ४७२ ही दिपक बाबुराव तायडे यांचे नावे असून शासनाच्या इंदिरा आवास योजने अंतर्गत त्या जागेवर घरकुल मंजूर झाले असून त्यासाठी वेगळे पत्र देण्यात येत नाही. मिळकत क्रमांक ४७३ ही अपिलार्थी यांची आहे. मिळकत क्रमांक ४७३ व मिळकत क्रमांक ४७२ चे नमुना नंबर ८ अपिलार्थीस दिले आहे व अपिलार्थी यांनी ते मान्य केले. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असेही सांगितले की, सिटी सर्व्हे नकाशा त्यांच्या कार्यालयात असून तो ते अपिलार्थीस देऊ शकतात. या नकाशाची एक प्रत अपिलार्थीस आयोगासमोर देण्यात आली. त्यामध्ये मिळकत क्रमांक ४७२ चा उल्लेख सिटी सर्व्हे क्रमांक १४८ असा करण्यात आला आहे. ही त्यांनी सुनावणीच्या वेळी सांगितलेली बाब अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना लेखी स्वरुपात नकाशाच्या झेरॉक्स प्रतीसह कळवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस नगर भूमापन विभागाकडील नकाशाची एक प्रत त्यामध्ये मौजे मारुळ येथील सिटी सर्व्हे नंबर १४८ म्हणजे मिळकत क्रमांक ४७२ आहे याचा स्पष्टपणे पत्रात उल्लेख करुन सदरची माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत कि. भालेराव, व्दारा, ॲड रमेश भालेराव, सिडको, एन-९, फ्लॅट क्रमांक आर-२६/एम-१३/५१, म्हाडा कॉलनी, रायगड नगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मारुळ, तालुका यावल, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यावल, तालुका यावल, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तानसेन सुकलाल पारधी, : अपीलकर्ता

प्लॉट नं. ६, गंगा बावडी जवळ, वसुंधरा कॉलनी, छावणी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे

जन अपिलीय अधिकारी तथा :

पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५०३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तानसेन सुकलाल पारधी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे - श्री. विष्णु देवकर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी असाच अर्ज राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांच्याकडे दिनांक २३-०१-२०१० ला सादर केला होता. त्यावर सुनावणी होऊन आदेशही पारीत झाले आहेत. अपिलार्थी यांनी सुनावणीत ही बाब आयोगापुढे मान्य केली आहे. सदर व्दितीय अपिलावर राज्य माहिती आयोग कोकण खंडपीठाने सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला असल्यामुळे हे व्दितीय अपील निष्प्रभ ठरत आहे. त्यामुळे प्रकरण बंद करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तानसेन सुकलाल पारधी, प्लॉट नं. ६, गंगा बावडी जवळ, वसुंधरा कॉलनी, छावणी,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. चामरगोरे किशनसिंह जलसिंह,<br>सिडको, एन-३, ५२०, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. चामरगोरे किशनसिंह जलसिंह | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. एस. बी. सोनवणे, जनसंपर्क अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. बी. व्ही. शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थाच्या जात वैधता प्रमाणपत्र बाबत सन १९९६-९७ ची संपूर्ण माहिती मागितली आहे. सन २००६ पर्यंत संपूर्ण मराठवाड्याकरिता औरंगाबाद येथे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय एकाच ठिकाणी कार्यरत होती. त्यानंतर लातूर येथे नांदेड, उस्मानाबाद, लातूर व हिंगोली या जिल्ह्यांकरिता एक समिती सन २००६ मध्ये निर्माण झाली त्यास समिती क्रमांक २ असे नाव दिले आहे. त्यावेळी त्या त्या जिल्ह्यातील संबंधित कागदपत्रे लातूर येथे हस्तांतरीत झाली आहेत. थोड्या प्रमाणात अभिलेखे औरंगाबाद येथे आहेत त्याची छाननी करण्यात आली त्यावेळी ही माहिती प्राप्त झाली नाही.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना दिनांक ०४-०१-२०१० च्या पत्रान्वये समिती क्रमांक २ लातूर यांनी कळविले आहे की, त्यांचे उपरोक्त प्रकरण समिती क्रमांक १, औरंगाबाद यांनी निकाली काढले आहे त्यामुळे त्याच्या माहितीकरिता समिती क्रमांक १, औरंगाबादकडे संपर्क करण्यात यावा. या पार्श्वभूमीवर समिती क्रमांक १ औरंगाबाद व समिती क्रमांक २, लातूर यांच्या कार्यालयात अभिलेख्याचा शोध घ्यावा लागेल व माहिती द्यावी लागेल. ही कार्यवाही औरंगाबाद व लातूर कार्यालयांनी दिनांक ३१ मे २०११ पर्यंत पूर्ण करावी. तथापि शोध घेऊनही नस्ती सापडली नाही तर दोन्ही कार्यालयात माहिती उपलब्ध नाही अशी माहिती अपिलार्थीस लेखी पत्राने द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी, समिती क्रमांक १, औरंगाबाद व समिती क्रमांक २, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संबंधीत नस्तीचा दिनांक ३१ मे २०११ पर्यंत कसोशीने शोध घ्यावा व ३१ मे २०११ पर्यंत नस्ती शोधून अपिलार्थीस माहितीच्या छायांकीत प्रती विनामूल्य देण्यात याव्यात. तथापि शोध घेऊनही नस्ती सापडली नाही तर दोन्ही कार्यालयात माहिती उपलब्ध नाही अशी माहिती अपिलार्थीस लेखी पत्राने आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक    ०६-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चामरगोरे किशनसिंह जलसिंह, सिडको, एन-३, ५२०, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, : अपीलकर्ता
मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सभा लिपिक, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद - श्री. भाऊसाहेब सदाशीव जोगस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद - श्री. टि. डी. कांबळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-०४-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही त्यामुळे त्यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली व अपिलार्थी यांनी ती स्विकारली आहे. अपिलार्थी यांनी या संपूर्ण मिळालेल्या माहितीची पाहणी करावी व त्यामध्ये त्यांना काही त्रुटी आढळून आल्यास त्याबाबत पंधरा दिवसाच्या आत त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्याबाबत तसे कळवावे व त्यापुढील पंधरा दिवसाच्या आत मूळ अर्जाच्या संदर्भात उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०६-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सभा लिपिक, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मापारी किशोर हरिचंद्र, : अपीलकर्ता
रा. रजापूर, ता.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी,
तलाठी कार्यालय,रजापूर,ता.पैठण,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,पैठण, जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी,सजा रजापूर,ता.पैठण, जि. औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,पैठण, जि.औरंगाबाद - श्री. जी.डी.सोनवणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो दिली नाही. तथापि आज ती माहिती उपलब्ध झाली असून ती अपिलार्थीस देण्यात येत आहे.ती माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत न दिल्यामुळे कलम ७(१) चा भंग झाला आहे, याबाबत तहसीलदार,पैठण यांना चौकशी करावी लागेल व दोषी आढळल्यास संबंधितांविरुध्द प्रशासकीय कारवाई करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) तहसीलदार,पैठण यांनी या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झाल्याबाबत चौकशी करावी व दोषी आढळल्यास संबंधितांविरुध्द प्रशासकीय कारवाई करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मापारी किशोर हरिश्चंद्र,मु.पो.रजापुर,ता.पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा रजापूर,ता.पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तहसीलदार, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिपक भिमराव पवार, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिपक भिमराव पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद - श्रीमती एस.एस.सुत्रावे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन

अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दि. ०९.०४.२०१० रोजी पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी ही बाब मान्य केली आहे. तथापि त्यांना काही बाबीबाबत माहिती मिळाली नाही, असे त्यांनी नमूद केले.

त्या बाबी, त्यावरील जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण व आयोगाचे निदेश खालीलप्रमाणे आहेत.

१) मुद्दा क्र.४ : कोतवाल ज्येष्ठता सूची - यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अशी ज्येष्ठतासूची ठेवण्यात येत नाही.- यासंदर्भात तसे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस कळवावे लागेल.

२) मुद्दा क्र.६ : कोतवालांना पदोन्नती दिलेल्या आदेशाच्या प्रती - यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सन २००१ मध्ये कोतवालांची शिपाई या पदावर पदोन्नती झाली आहे. - संदर्भित आदेशाच्या प्रती द्याव्या लागतील.

३) मुद्दा क्र. १२ : त्रयस्थ पक्ष श्री. बी.डी.म्हस्के यांच्या सेवापुस्तकाच्या सर्व पानांच्या छायांकित प्रती - यासंदर्भात संबंधित त्रयस्थ कर्मचारी यांची वैयक्तिक माहिती वगळून उर्वरित माहिती जी शासकीय कामकाजामुळे निर्माण झाली आहे ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १० प्रमाणे द्यावी लागेल.

४) मुद्दा क्र. १३ : त्रयस्थ श्री. बी.डी.म्हस्के सा.प्र.वि.आस्थापना हे ज्या पदावर काम करतात त्या पदाची माहे मे,२०१० या वर्षात संभाव्य होणाऱ्या बदली पात्र कर्मचाऱ्यांची यादी - अशी यादी त्यावेळी तयार केली असेल तर ती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रामनाथ कडुजी इथापे,<br>भगतसिंग नगर हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं. सह-२/९,<br>हर्सूल, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, शेवगांव,<br>तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद,<br>अहमदनगर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, नविन दहीफळ, तालुका शेवगांव,<br>जिल्हा अहमदनगर - श्री. पवार डी. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शेवगांव,<br>तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर - श्री. ए. व्हि. इंगळे | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, नविन दहीफळ, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर, श्री. चेमटे जी. बी., प्रतिनिधी ॲडव्होकेट श्री. विजय ढाकणे यांचे सह | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-०९-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी त्यांचे वकिलासह व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या वकिलाने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा सदरचा माहितीचा अर्ज हा आज रोजी पर्यंत जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेला नाही. व्दितीय अपिलाच्या संदर्भातील नोटीसीबरोबर सदर अर्जाची प्रत त्यांना प्राप्त झालेला आहे. यावरुन असे दिसते की, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव यांच्याकडे अपिलार्थीने दिनांक २६-०९-२००९ रोजीचा अर्ज पाठविला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांच्याकडे अपिलार्थीचा अपील अर्ज प्राप्त झालेला नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आलेली नाही. तसेच त्यांनी आयोगास पुढे अवगत केले की, या प्रकरणात जन माहिती अधिकारी ग्रामसेवक व जन अपिलीय अधिकारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर हे आहेत. याबाबत दोन महिन्यापूर्वी आदेश निघाले आहेत.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांचा युक्तिवाद ऐकून घेता आला नाही तथापि या प्रकरणी प्रथम अपिलावर सुनावणी होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-११-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-११-२००९ रोजीच्या प्रथम अपील

अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामनाथ कडुजी इथापे, भगतसिंग नगर हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं. सह-२/९, हर्सूल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, नविन दहीफळ, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. तानसेन सुकलाल पारधी,<br>प्लॉट नं. ६, गंगा बावडी जवळ, वसुंधरा कॉलनी, छावणी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस आयुक्त, ठाणे शहर, ठाणे | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या खंडपीठापुढे व्दितीय अपील क्रमांक ५०३/२०१० ची सुनावणी दिनांक ०६.०५.२०११ रोजी झाली त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी स्वत: उपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण पाच अशा माहितीचे अर्ज त्यांच्याकडे केले आहेत व या पाचही माहितीच्या अर्जाची व्दितीय अपिले कोकण खंडपीठ व औरंगाबाद खंडपीठाकडे केली आहेत. कोकण खंडपीठापुढे या पाचही अर्जाच्या व्दितीय अपिलांवर सुनावणी झाली आहे त्यामुळे या खंडपीठापुढे अपिले घेण्यात येऊ नये अशी आयोगास विनंती केली. अपिलार्थी त्या सुनावणीस उपस्थित होते व त्यांनी त्यावेळी ही बाब मान्य केली आहे.

आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या सर्व माहिती अर्जाच्या विचाराधीन व्दितीय अपिलांवर कोकण खंडपीठापुढे सुनावणी झाली आहे व कोकण खंडपीठाने त्यावर आदेश पारीत केले आहेत असे दिसून येत आहे त्यामुळे सदरचे व्दितीय अपील निष्प्रभ ठरत आहे. या खंडपीठापुढील हे व्दितीय अपील प्रकरण रद्द करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तानसेन सुकलाल पारधी, प्लॉट नं. ६, गंगा बावडी जवळ, वसुंधरा कॉलनी, छावणी,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद,<br>प्लॉट नं. १३, बशीर कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. खॉन अझमन, कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद<br>- श्री. रविंद्र निकम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये एकूण ३५ मुद्दयांवर माहिती मागितली आहे. सदरची माहिती त्यांना दिनांक २९-१२-२००९ रोजी पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०२-२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला आहे की, अपिलार्थी यांना माहितीची पाहणी देण्यात यावी.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही त्याचप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती देण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कळविण्यात आलेले नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब केलेला आहे. (कलम ७ (१)) त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीस पाहणीसाठी कळवून या माहिती अर्जाच्या संदर्भात प्रकरण संपुष्टात आणण्याकरिता प्रयत्न केलेले नाही. या सर्व बाबीकरिता जबाबदार असलेले संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे अधिकारी कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करावा लागेल.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची

व्यवस्था करावी.  ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे अधिकारी कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करावा.  ही कारणे दाखवा नोटीस जन माहिती अधिकारी व संबंधीत कर्मचारी यांना आयुक्त, महानगरपालिका यांनी तामील करण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक    १०-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद, प्लॉट नं. १३, बशीर कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.सुरेश विठ्ठलसिंग महाजन, : अपीलकर्ता
रा.कन्नड,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
नाशिक विभाग,नाशिक
जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
नाशिक विभाग,नाशिक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,नाशिक विभाग, नाशिक- श्री. जे. आर. वळवी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,नाशिक विभाग,नाशिक-प्रतिनिधी - श्री. एस.पी.शिवलकर, विधी अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - विभागीय समाजकल्याण अधिकारी,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्र.१,नाशिक विभाग,नाशिक - श्री. बी.व्ही.शिंदे | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व तत्कालीन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांच्या कार्यालयाचे स्थलांतर झाले आहे व अभिलेखे लावण्याचे काम चालू आहे. त्यामुळे मूळ संचिका प्राप्त करुन घेऊन प्रस्तुत प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास सादर करण्यासाठी वेळ देण्यात यावा. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महाजन सुरेश विठ्ठलसिंग,मु.जवाहर कॉलनी,म्हाडा जवळ,हिवरखेडा

रोड,कन्नड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,नाशिक विभाग,नाशिक- यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.आनंद गोपालराव पोथीकर,रा.औरंगाबाद : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या.शहर विभाग क्र.१,
औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या.शहर विभाग क्र.१,
औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५२७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.आनंद गोपालराव पोथीकर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी दि. २१.०१.२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे कार्यकारी अभियंता, शहर मंडळ,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.,औरंगाबाद यांच्याकडून एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यातील काही माहिती त्यांना प्राप्त झाली आहे. तथापि माहिती त्यांना अपूर्ण मिळाली आहे व खालीलप्रमाणे माहिती अप्राप्त आहे.

दुकान गाळा क्र. ७,गुलमोहर अपार्टमेंट,जुनाबाजार, हेड पोस्ट ऑफीससमोर तळमजला या दुकानाची दि. ०९.०३.२००९ रोजी श्री. अन्वर काझी यांच्याकडून खरेदी केलेली आहे. खरेदीच्या दिवशी म्हणजे दि. ०९.०३.२००९ रोजी या दुकानाचे विद्युत मीटर ज्या व्यक्तीच्या नावे होते ते विद्युत कनेक्शन मिळविण्यासाठी अर्जदाराने दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती - जसे ए फॉर्म,टॅक्स पावती,शेजारचे लाईटबील, बॉण्ड पेपर इत्यादी.

उपरोक्त माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीअन्वये देय होत आहे.जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आनंद गोपालराव पोथीकर, धनमंडी बाग,अंबर गॅस एजन्सीमागे,मुख्य डाक घर रोड,जुनाबाजार,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महावितरण,पॉवर हाऊस उपविभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महावितरण, शहर विभाग

क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.साहेबराव नामदेव नरोडे, : अपीलकर्ता
रा.दौलताबाद, ता.जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक अभियंता,
ग्रामीण उपविभाग-१,
महावितरण,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण विभाग,महावितरण,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अभियंता, ग्रामीण उपविभाग-१,महावितरण,औरंगाबाद - श्री. आर.एच.कवाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,ग्रामीण विभाग,महावितरण,औरंगाबाद-श्री.सी.सी.हुमणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दि. ०१.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस हस्तपोच देण्याची व्यवस्था केली आहे. ती अपिलार्थीतर्फे श्री. विष्णू नरोडे यांनी स्वीकारली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १७.०५.२०१० रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली असल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साहेबराव नामदेव नरोडे,मु. पो.गवळीवाडा,द्वारा अमोल प्रोव्हीजन्स, दौलताबाद, ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, ग्रामीण उपविभाग-१, महावितरण,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ग्रामीण विभाग, महावितरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.राजेंद्र देविदास दौड, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज अँड जनरल हॉस्पीटल,नागपूर
जन अपिलीय अधिकारी,
इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज अँड जनरल हॉस्पीटल,नागपूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - (१) श्री. संतोष जी. कार्ले (२) श्री. व्ही.एन.वैद्य | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०५.२०१० नागपूर खंडपीठास प्राप्त<br>दि.२४.०५.२०१० औ.बाद खंडपीठास प्राप्त |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. व्ही.एन.वैद्य व श्री. संतोष कार्ले उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांच्या दोनही प्रतिनिधीनी त्यांची बाजू आयोगासमोर मांडली. त्यांनी आयोगास असे सांगितले की, ते स्वत: अपंग असून त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे दोन त्रयस्थ अपंग कर्मचाऱ्यांशी संबंधित अपंगत्त्वाबद्दलच्या प्रमाणपत्राबाबत व त्यासाठी दाखल केलेल्या कागदपत्रातील तपशील व तपासणीचा अहवाल इ.शी संबंधित सर्व कागदपत्रे मागितलेली आहेत. ही माहिती त्यांना त्यांच्या पदोन्नतीसाठी आवश्यक आहे.त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणीही घेतलेली नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, अपिलार्थीच्या दि. ०९.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन प्रथमत: अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी व मेडीकल कॉन्सीलची मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता,इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज ॲण्ड जनरल हॉस्पीटल, नागपूर यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम व द्वितीय अपील अर्जासह प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अधिष्ठाता,इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज ॲण्ड जनरल हॉस्पीटल, नागपूर अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०९०३.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १०-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र देविदास दौड,द्वारा एन-११,बी-१२७/३, सुभाषचंद्र बोसनगर, टी.व्ही.सेंटर, हडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज ॲण्ड जनरल हॉस्पीटल, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीष्ठाता,इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज ॲण्ड जनरल हॉस्पीटल, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.सय्य्द साबेर सय्यद सरदार, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - श्री.शेख मोईनोद्दीन शेख मुनिरोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद - श्री. एम.ए.जविद खान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्राध्यापक,शरीररचनाशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद - डॉ. सी.व्ही.दिवाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०१.२००८ ते दि. ०१.११.२००९ या कालावधीत कँटीनमधील रिपेअरींग,कलर काम,नवीन फर्निचर,टेबल, खुर्च्या इ.,लाईट फीटींग इ.सर्व कामांसाठीच्या साहित्य खरेदीबाबत विस्तृत स्वरुपाची माहिती तीन मुद्यांद्वारे मागितली होती. ती माहिती अपिलार्थीस दि. ०६.०१.२०१० रोजी देण्यात आली. ती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे. त्याची पोच अपिलार्थीने त्यांना दि. ०६.०१.२०१० रोजी दिली असून जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखावर आहे.उपलब्ध कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्यातर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री.शेख मोईनोद्दीन शेख मुनिरोद्दीन उपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये अपुरी व चुकीची माहिती मिळाली आहे,असे नमूद केले आहे.यासंदर्भात अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने आज सुनावणीच्यावेळी आयोगास सांगितले की,त्यांच्या मूळ अर्जातील बी.ॲण्ड सी.कडून केलेल्या कामासंबंधी माहिती मिळालेली नाही. यासंदर्भात अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण होत असल्यामुळे या माहितीकरिता त्यांना संबंधित जन माहिती अधिकाऱ्याकडे स्वतंत्र अर्ज करावा लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर प्रकरण बंद करण्यात येऊन आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १०-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार,हिना मंजील,टाऊन हॉल,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक,शरीररचनाशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.अरुण रघुनाथ गायके, : अपीलकर्ता
रा.रेल,ता.कन्नड,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -प्रशासकीय अधिकारी, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद - श्री. सय्यद तारेख ईमादोद्दीन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद - डॉ.सुरेश रा.बारपांडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १०.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. १०.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रघुनाथ गायके,मु.पो.रेल,ता.कन्नड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.आकाशदिप राहुल साळवे, : अपीलकर्ता
रा.भादली,ता.वैजापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय,वैजापूर,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, वैजापूर,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म-२),तहसील कार्यालय,वैजापूर,जि.औरंगाबाद- सौ. ए.व्ही.रघू | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांचे द्वितीय अपील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये विहित मुदतीत सादर न करता सुमारे १०३ दिवसांच्या विलंबाने सादर केलेले आहे. या विलंबाकरिता कोणतेही समर्थनीय कारण दिलेले नाही.

आज सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली काही माहिती दि. १५.०९.२००९ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. उर्वरित माहिती त्यांच्याकडे आज तयार आहे व ती त्या अपिलार्थीस देऊ शकतात. यास्तव ही माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आकाशदिप राहुल साळवे, मु.भादली,पो.तलवाडा,ता.वैजापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-२),तहसील कार्यालय, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.रविंद्र भागाजी खरात, : अपीलकर्ता
रा.करमाड,ता.जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
१.मंडळ अधिकारी, चित्तेगाव,ता.जि.औरंगाबाद
२.तलाठी, पांढरी पिंपळगाव,ता.जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५३३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -मंडळ अधिकारी, चित्तेपिंपळगाव, ता.जि.औरंगाबाद- श्री.आर.व्ही.शिंदे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - नायब तहसीलदार (म-१), तहसील कार्यालय,औरंगाबाद - श्री. डी. एन.भारस्कर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०७.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, चित्तेपिंपळगाव, ता. जि.औरंगाबाद यांनी आयोगास प्रस्तुत द्वितीय अपिलासंदर्भात सद्यस्थिती सादर करण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

अंतरिम आदेश

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र भागाजी खरात, रा.करमाड,ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, चित्तेपिंपळगाव, ता.जि.औरंगाबाद- यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-१), तहसील कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.जी.वी.राजपुत, : अपीलकर्ता
रा.कोबापूर,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),मुंबई.
जन अपिलीय अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),मुंबई.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५३४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.जी.वी.राजपुत | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),मुंबई - श्री. एच.एल.भुरे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),मुंबई - श्री. डी.टी.देवळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०६.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण दहा मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यापैकी तीन मुद्यांवरील माहिती विधी शाखेशी

संबंधित होती. ती दि. ३१.०३.२०१० रोजी देऊन प्रथम प्रतिसाद दिलेला आहे. उर्वरित माहिती आस्थापना शाखेकडे होती. ती आता त्यांच्याकडे प्राप्त झालेली आहे व ती अपिलार्थीस देण्यासाठी उपलब्ध आहे. आयोगाच्या सूचनेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती हस्तांतरित केली. अपिलार्थी यांना या कागदपत्रांची पाहणी करावी लागेल व ती कागदपत्रे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीप्रमाणे आहेत किंवा कसे, याबाबतची पडताळणी करावी लागेल. नसल्यास त्यासंदर्भात त्यांचे म्हणणे जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांचे आत कळवावे लागेल. पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उर्वरित माहिती द्यावी लागेल.ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी लागेल.माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

आयोगाच्या दृष्टीक्षेपात असेही आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे बरीचशी माहिती प्रश्नार्थक, खुलासेवजा व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी मागितलेली आहे. त्यामुळे ही माहिती, अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या संज्ञेमध्ये बसत नाही. याची अपिलार्थी यांनी नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही होईल, यासाठी दक्ष राहावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीकडून प्रतिसाद प्राप्त होताच त्यासंदर्भातील अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भाने माहिती पुढील पंधरा दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जी. व्ही. राजपुत,मु.कोबापुर,पो.कनकोरी,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

(मुख्यालय),कल्पतरु पॉईण्ट,२ रा माळा,सायन,मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),कल्पतरु पॉईण्ट,२ रा माळा,सायन,मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. पल्लवी संजय सोनखेडे (साळवे),रा.औरंगाबाद : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य
महाविद्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य
महाविद्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी -प्रतिनिधी (पती)- श्री. संजय गोपाळराव सोनखेडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अधिव्याख्याता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कला व वाणिज्य महाविद्यालय,औरंगाबाद - श्री. एन.एम.करडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्राचार्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कला व वाणिज्य महाविद्यालय,औरंगाबाद - डॉ. पी.सी.पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे पती, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी आज उपलब्ध करुन घेतली आहे व ते अपिलार्थीस देऊ शकतात.

अपिलार्थी यांचे प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, आजपर्यंत त्यांना माहिती मिळालेली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आजपर्यंत सुनावणी घेतली नाही यामुळे त्यांचे दोन वर्षांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्यात यावी व नुकसान भरपाई देण्यात यावी.

आयोगाने सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रतिनिधीस आयोगापुढे माहिती दिली. ती अपिलार्थी यांनी स्वीकारली. या माहितीची त्यांनी प्रथम पाहणी करावी. त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल. तदनंतर पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या मूळ अर्जासंदर्भाने अपिलार्थीस माहिती द्यावी लागेल, असे पुढे आयोगाने सूचित केले. आयोगापुढे अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झाल्याचे स्पष्ट होत आहे. या विलंबाबाबत विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना चौकशी करावी लागेल. त्याचबरोबर अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत न मिळाल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे व नुकसान भरपाईची मागणी केली आहे, याकरिता त्यांचे स्तरावर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या समक्ष चौकशीची कार्यवाही योजावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपूर्ण माहितीबाबत पंधरा दिवसांचे आत नेमके कळविल्यास उर्वरित माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भाने नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

२) सहसंचालक (उच्च शिक्षण) औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत चौकशी करुन संबंधितावर यथोचित कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी उपस्थित केलेल्या नुकसान भरपाईच्या मुद्याबाबत संपूर्ण चौकशी करुन अभिप्रायासह अहवाल आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. पल्लवी संजय सोनखेडे (साळवे),द्वारा इग्बालसिंग गिल यांचे घर, घर नं.१-८-२-४९/२,गौतमनगर,घाटी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिव्याख्याता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कला व वाणिज्य महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कला व वाणिज्य महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहसंचालक (उच्च शिक्षण),औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद मोईनोद्दीन सय्यद सैफोद्दीन ईनामदार, : अपीलकर्ता
न्यू बायजीपुरा, इंदिरानगर, गल्ली नंबर ११, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अतिरिक्त शहर अभियंता (तांत्रिक विभाग),
महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५३६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद मोईनोद्दीन सय्यद सैफोद्दीन ईनामदार | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त शहर अभियंता (तांत्रिक विभाग), महानगरपालिका, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. एम. डी. सोनवणे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी रॅम्के या खाजगी संस्थेने कचरा व घाण उचलण्यासाठी ॲपे रिक्षावर जे ड्रायव्हर कंत्राटी पध्दतीने नोकरीवर ठेवले आहेत त्यासंदर्भात या संस्थेने स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिली होती काय, कोणत्या पेट्रोलपंपावर डिझेल घेतले जाते, त्याचे बील कोणी अदा केले, त्या कंत्राटी कर्मचा-यांचा प्रोव्हीडंट फंड त्यांचे नावे जमा होतो काय इत्यादी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ खाली त्रयस्थांना विचारणा केली असता त्यांनी माहिती उघड करण्यास आक्षेप कलम 8 (1) (d) प्रमाणे घेतला. त्यानुसार अपिलार्थीस दिनांक २५-०२-२०१० रोजी त्यांच्या मूळ अर्जाच्यासंदर्भात कळविण्यात आलेले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २१-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय कायम केला आहे व रॅम्के या संस्थेने दिलेल्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिलेली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, महानगरपालिकेने सदरचे कंत्राट रॅम्के कंपनीस दिलेले आहे व या कंत्राटानुसार कंत्राटाच्या पुर्ततेसाठी कारवाई करण्यासाठी खाजगी कंपनी स्वतंत्र व सक्षम आहे. आयोगाच्या पुढे असेही निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, सदरची माहिती महानगरपालिकेकडे नाही किंवा कंत्राटी कलमानुसार कंपनीने त्यांना देणे आवश्यक नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देय होणार नाही तथापि आयोगाचे असे मत आहे की, कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येनुसार कंत्राटाच्या कलमानुसार किंवा विहित कायद्यानुसार जी माहिती महानगरपालिकेला या कंपनीकडून मिळविता येऊ शकेल त्यांच्याकडून जी अपिलार्थी यांनी मागितली आहे ती अपिलार्थीस द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अर्जावर पुनर्विचार करुन अपिलार्थीस देय असलेली माहिती देण्याची व्यवस्था आयोगाचे आदेश प्राप्त होताच एका महिन्याच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ११-०५-२०११**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद मोईनोद्दीन सय्यद सैफोद्दीन ईनामदार, न्यू बायजीपुरा, इंदिरानगर, गल्ली नंबर ११, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त शहर अभियंता (तांत्रिक विभाग), महानगर पालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

अध्यक्ष, : अपीलकर्ता

कामधेनू सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., जाधववाडी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सु. वा. कुलकर्णी, अध्यक्ष, कामधेनू सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., जाधववाडी, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. वसंत मा. निकम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. डी. पी. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०४-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३१-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी दोन मुद्दयांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी पहिल्या मुद्दयाची म्हणजे कामधेनू सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सुधारीत रेखांकन मंजुरीची प्रत मिळाली आहे. तथापि दुस-या मुद्दयाची म्हणजे त्याच्या नकाशाची (layout) प्रत मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, सदरचे अभिलेखे सन १९९९-२००० या वर्षाचे असून ते त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही उपलब्ध झाले नाहीत.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) नुसार माहिती या शब्दाच्या संज्ञेनुसार नकाशाची प्रत त्यांना देय होत आहे व ती अपिलार्थी यांना द्यावी लागेल. याकरिता आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी तीन कर्मचा-यांचा एक गट तयार करावा व या माहितीचा शोध विशेष मोहीम हाती घेऊन करण्यात यावा. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करण्यात यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे या माहितीचा शोध विशेष मोहीम हाती घेऊन करावा व अपिलार्थीस माहिती देण्यात यावी. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करण्यात यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ११-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अध्यक्ष, कामधेनू सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., जाधववाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण एकनाथ औटे,<br>व्दारा, माऊली भोजनालय, माहेश्वरी धर्मशाळा, उद्यान रोड, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. आर. आर. जयस्वाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०८-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी जानेवारी २००९ ते दिनांक १५ मार्च २०१० पर्यंत पैठण तालुक्यातील एकूण चार रस्त्यावर करण्यात आलेल्या विविध कामाचे अंदाजपत्रक, वर्क ऑर्डर, शेड्युल बी इत्यादीच्या प्रती तसेच उप अभियंता, शाखा अभियंता यांच्या रोजनिशीच्या प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थी यांना ही संपूर्ण माहिती दिनांक ०२-०७-२०१० रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व्यापक असल्यामुळे ती एकत्र करुन देण्यास काही कालावधी लागला तो क्षमापीत करण्यात यावा अशीही जन माहिती अधिकारी यांनी आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना दिनांक ०२-०७-२०१० रोजी लिहिलेल्या पत्राची प्रत आयोगापुढे आहे. या पत्रामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक १५-०३-२०१० च्या अर्जावरील मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना मिळाली आहे तरी प्रकरण निकाली काढण्यात यावे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण एकनाथ औटे, व्दारा, माऊली भोजनालय, माहेश्वरी धर्मशाळा, उद्यान रोड, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गिरीष सुरेशराव गायकवाड, : अपीलकर्ता
एम. टी. डी. सी. च्या बाजूला, मटन मार्केट समोर,
रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बिडकीन, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५३९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गिरीष सुरेशराव गायकवाड | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बिडकीन,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. साळवे बी. टी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. जी. एस. पवार | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०९-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०४-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २९-०५-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी बिडकीन ग्रामपंचायतीच्या हद्दीमधील स्मशानभूमीबाबत किती स्मशानभूमी आहेत, कोणत्या समाजाच्या आहेत, कोणत्या गट नंबरमध्ये आहेत, त्याचे क्षेत्र किती आहे व कशाच्या आधारे त्यांची नोंद करण्यात आली आहे याची माहिती मागितली आहे. सदरची माहिती ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नाही असे अपिलार्थीस दिनांक ०९-०४-२०१० ला कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, ही माहिती ग्रामपंचायतीकडे उपलब्ध आहे. त्यामुळे ही माहिती त्यांना देण्यात यावी.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २९-०५-२०१० रोजी निर्णय देताना प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी न्यायालयात याच मुद्दयावर याचिका दाखल केली आहे व सध्या प्रकरण न्यायालयात चालू असल्यामुळे त्यामध्ये हस्तक्षेप केल्यास तो न्यायालयाचा अवमान होईल. याकरिता अपिलार्थीने न्यायालयाच्या निर्णयानंतर योग्य प्राधिकरणाकडे दाद मागावी असे कळवून अपील निकाली काढले आहे. या सर्व बाबी विचारात घेता या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण (श्री. बी. बी. कुलकर्णी) यांनी गांर्भीयाने बघणे आवश्यक ठरते. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण यांना समक्ष बोलावून अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीबाबत कागदपत्रे उपलब्ध असल्यास देण्याची व्यवस्था करावी अन्यथा कागदपत्रे उपलब्ध नसल्यास त्याची लेखी नोंद घेऊन अपिलार्थीस तसे कळवावे लागेल. त्याचप्रमाणे ही कागदपत्रे कोणत्या कार्यालयात उपलब्ध असतील त्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांचा तपशील अपिलार्थीस द्यावा लागेल व त्यानुसार अपिलार्थी यांना त्या जन माहिती अधिका-याकडे माहिती अर्ज करण्यास सोईस्कर ठरेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कारवाई आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०५-२०११**

------------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गिरीष सुरेशराव गायकवाड, एम. टी. डी. सी. च्या बाजूला, मटन मार्केट समोर, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बिडकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीमंत साहेबराव नरके, : अपीलकर्ता
मु. पो. टाकळी अंबड, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टाकळी अंबड,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीमंत साहेबराव नरके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टाकळी अंबड,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. जी. एस. पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३-०४-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी सन २००२ ते २००७ पर्यंत दारिद्र्यरेषेखालील लोकांना देण्यात आलेल्या घरकुलासंबंधीची माहिती मागितली आहे. आतापर्यंत त्यांना ही माहिती मिळाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २३-०४-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, टाकळी अंबड, तालुका पैठण यांनी आठ दिवसाच्या आत विनाशुल्क माहिती पुरवावी. तथापि त्यांना अद्यापही ही माहिती प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसून त्यांच्याविरुध्द गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांनी दिनांक २०-०७-२०१० रोजी कारणे दाखवा नोटीस दिली असल्याचे आयोगास अवगत केले. या प्रकरणी श्री. कुलकर्णी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांना व्यक्तिशः लक्ष घालून अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने व विनामूल्य पाठवावी लागेल. त्याचप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, टाकळी अंबड, तालुका पैठण यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांना रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. श्री. कुलकर्णी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांनी या प्रकरणात व्यक्तिशः लक्ष घालून अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने व विनामूल्य पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, टाकळी अंबड, तालुका पैठण यांना रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीमंत साहेबराव नरके, मु. पो. टाकळी अंबड, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टाकळी अंबड, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. कुलकर्णी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाळगीर गंगागीर गिरी,<br>रा. सावरगाव, पो. उंबरखेड, तालुका कन्नड,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड,<br>तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड,<br>तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. उत्तरवार आर. आर., कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद - श्री. ए. एम. देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-११-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २६-०२-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगापुढे कागदपत्रे दाखल करण्यासाठी काही वेळ मागवून घेतला. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळगीर गंगागीर गिरी, रा. सावरगाव, पो. उंबरखेड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कमलाकर त्रिंबकराव रांजेकर,<br>१२, श्रीस्वामी श्रीनगर खिवंसरा पार्क समोर, गारखेडा परिसर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कमलाकर त्रिंबकराव रांजेकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- श्री. ए. वाय. आढाव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- श्री. एच. बी. झनझन | : | उपस्थित |
| ३.४ | अपिलार्थी यांचे मदतनीस श्री.मांजरमकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | -- |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे मदतनीस श्री.मांजरमकर, जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना माहिती मिळाली आहे तथापि पाहिजे ती माहिती मिळाली नाही. त्याकरिता आयोगाने त्यांना सूचित केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २५-०५-२०१० (आयोगास प्राप्त दि.३१-०५-२०१०) च्या व्दितीय अपिलात नमूद केलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना कोणती माहिती मिळाली नाही ते नेमके सांगावे म्हणजे त्याची नोंद जन माहिती अधिकारी घेतील. त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे माहिती हवी असल्याचे सांगितले.

१. अपिलार्थी हे १९६३ मध्ये विस्तार अधिकारी (पंचायत) होते व त्यांची १९६६ मध्ये विस्तार अधिकारी (कृषि) या पदावर बदली करण्यात आली असे करताना घेतलेल्या निर्णयाबाबत आदेश, टिपणी इत्यादीच्या प्रती.

२. फक्त अपिलार्थी यांची एकट्याचीच वर नमूद केल्याप्रमाणे विस्तार अधिकारी (पंचायत) मधून विस्तार अधिकारी (कृषि) मध्ये बदली करण्यात आली. अपिलार्थी हे विस्तार अधिकारी (पंचायत) असताना त्यांना विस्तार अधिकारी (कृषि) म्हणून बदली देण्यात आली त्या प्रस्तावाची, आदेशाची व टिपणी इत्यादीच्या प्रती देण्यात याव्यात.

३. अपिलार्थी यांना विस्तार अधिकारी (कृषि) या पदाची मानीव तारीख देण्यात आली नाही. याबाबत त्यांनी केलेल्या अर्जावर घेतलेल्या निर्णयाच्या, आदेशाच्या व टिपणीच्या साक्षांकीत प्रती.

४. अपिलार्थी यांनी १९९० मध्ये अपर आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे मानीव तारीख मिळण्याबाबत अर्ज केला. या अर्जाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी विचार करावा असे त्यांना अपर आयुक्त, औरंगाबाद यांनी कळविले आहे . यावर जिल्हा परिषदेने कोणता अहवाल पाठविला त्याचप्रमाणे अंतिम निर्णय काय घेण्यात आला याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या व टिपणीच्या प्रती त्यांना देण्यात याव्यात.

अपिलार्थीस वरील माहिती देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. त्याचप्रमाणे त्यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध नाही व नस्ती दुस-या कार्यालयात असतील तर त्या संबंधित जन माहिती अधिका-याचा पत्ता व फोन नंबर अपिलार्थीस कळवावा लागेल म्हणजे अपिलार्थीस त्यांच्याकडे अर्ज करणे सोईस्कर होईल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कमलाकर त्रिंबकराव रांजेकर, १२, श्रीस्वामी श्रीनगर खिवंसरा पार्क समोर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अब्दुल जावेद अब्दुल वाहेद,<br>मु. पो. भाजी मंडई, कन्नड, तालुका कन्नड,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, संजय गांधी उर्दू हायस्कूल, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अब्दुल जावेद अब्दुल वाहेद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, संजय गांधी उर्दू हायस्कूल, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - प्रतिनिधी ॲडव्होकेट श्री. मेहर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री. मेहेर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांनी त्यांची बाजू मांडण्यासाठी काही कालावधी द्यावा व त्याकरीता सुनावणी पुढे ढकलण्यात यावी अशी आयोगास विनंती केली. ती मान्य करण्यात आली. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल जावेद अब्दुल वाहेद, मु. पो. भाजी मंडई, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, संजय गांधी उर्दू हायस्कूल, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. तानसेन सुकलाल पारधी,<br>प्लॉट नं. ६, गंगा बावडी जवळ, वसुंधरा कॉलनी, छावणी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या खंडपीठापुढे व्दितीय अपील क्रमांक ५०३/२०१० ची सुनावणी दिनांक ०६.०५.२०११ रोजी झाली त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी स्वत: उपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण पाच अशा माहितीचे अर्ज त्यांच्याकडे केले आहेत व या पाचही माहितीच्या अर्जाची व्दितीय अपिले कोकण खंडपीठ व औरंगाबाद खंडपीठाकडे केली आहेत. कोकण खंडपीठापुढे या पाचही अर्जाच्या व्दितीय अपिलांवर सुनावणी झाली आहे त्यामुळे या खंडपीठापुढे अपिले घेण्यात येऊ नये अशी आयोगास विनंती केली. अपिलार्थी त्या सुनावणीस उपस्थित होते व त्यांनी त्यावेळी ही बाब मान्य केली आहे.

त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ११.०५.२०११ रोजी या खंडपीठास दिलेले पत्र आयोगासमोर आहे त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या सर्व माहिती अर्जाच्या विचाराधीन व्दितीय अपिलांवर कोकण खंडपीठापुढे सुनावणी झाली आहे व कोकण खंडपीठाने त्यावर आदेश पारीत केले आहेत असे नमूद केले आहे त्यामुळे सदरचे व्दितीय अपील निष्प्रभ ठरत आहे. या खंडपीठापुढील हे व्दितीय अपील प्रकरण रद्द करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तानसेन सुकलाल पारधी, प्लॉट नं. ६, गंगा बावडी जवळ, वसुंधरा कॉलनी, छावणी,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जगन्नाथ तुकाराम जगदाळे,<br>एन-११, बी-१६३/०२, हडको, टी. व्ही. सेंटरजवळ,<br>औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, फुलंब्री, तालुका फुलंब्री,<br>जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>औरंगाबाद (ग्रामीण), औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जगन्नाथ तुकाराम जगदाळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, फुलंब्री, तालुका फुलंब्री,<br>जिल्हा औरंगाबाद - श्री. मारुती ज्ञानोजी थोरात | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>औरंगाबाद (ग्रामीण), औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. संदिप<br>सुखानंद जाधव, पोलीस उप अधीक्षक (मु.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-०३-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १०-०३-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०१-०२-२०१० च्या माहिती अर्जामध्ये एकंदर १९ मुद्दयांवर विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये सर्व उपलब्ध माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन (सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-०० वाजेपर्यंत) उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जगन्नाथ तुकाराम जगदाळे, एन-११, बी-१६३/०२, हडको, टी. व्ही. सेंटरजवळ,

औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, फुलंब्री, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, औरंगाबाद (ग्रामीण), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.सोमेश्वर जनार्धन आहेर, : अपीलकर्ता
रा.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय,पैठण,
जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय,पैठण,
जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.सोमेश्वर जनार्धन आहेर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. प्रकरणात त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. यासाठी

सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, मु.पो.स्वयंभू निवास,जैनपुरा, पैठण, ता.पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय,पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद कार्यालय,पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.परदेशी प्रकाश कानुचंद,<br>रा.पैठण, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा समादेशक,<br>अहमदनगर जिल्हा होमगार्ड,अहमदनगर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा समादेशक होमगार्ड,अहमदनगर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तत्कालीन प्रशासीक अधिकारी, होमगार्ड,अहमदनगर - श्री. एस.बी.जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - सध्याचे प्रशासीक अधिकारी, होमगार्ड,अहमदनगर - श्री. एस.एन.पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा समादेशक,होमगार्ड, अहमदनगर - श्री. व्ही. के.भोर्डे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती दि. २५०१.२०१० रोजी युपीसीद्वारे पाठविण्यात आली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, उर्वरित माहिती ही तालुका कार्यालयाशी संबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांचे जिल्हास्तरावरील कार्यालय असल्यामुळे ती संकलीत करण्यास वेळ लागला आहे. ही बाब अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कळविलेली आहे. आज रोजी त्यांच्याकडे सर्व माहिती उपलब्ध आहे. ती ते अपिलार्थीस देऊ शकतात. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस काही माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे. उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्याकडे उपलब्ध असलेली उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पी. के. परदेशी, सहजीवन कॉलनी, आरएम ८१/८,बजाजनगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासीक अधिकारी, कार्यालय जिल्हा समादेशक, होमगार्ड, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समादेशक,होमगार्ड, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.स्वप्निल भास्करराव निकम,रा.औरंगाबाद : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई.
जन अपिलीय अधिकारी तथा
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.स्वप्निल भास्करराव निकम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),मुंबई - श्री. एच.एल.भुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),मुंबई - श्री. डी.टी.देवळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दि.२७.०४.२०१० व ०५.०५.२०११ अशी दोन टप्प्यात देण्यात आली आहे.ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी मान्य केली. तथापि त्यांना काही मुद्यावरील

माहिती अपूर्ण मिळालेली आहे, असे त्यांनी आयोगास सांगितले. ती अपुर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०३.०२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ज्या पाच त्रयस्थ व्यक्तींची नावे तक्त्यामध्ये नमुद केली आहेत, त्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आलेल्या यादीतील ज्येष्ठता क्रमांक व दिनांक

२) मुद्दा :(क) - सन १९९७ पासून दि. ०३.०२.२०१० (अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांक) पर्यंत शासनाकडून मंजूर झालेल्या रिक्त जागांची संख्या व त्यातून भरलेल्या जागांची संख्या. या व्यतिरिक्त काही रिक्त जागा भरल्या असतील तर त्यांची संख्या

ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. ती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स्वप्निल भास्करराव निकम,७३,'प्रणव', महाजन कॉलनी,सिडको,एन-२, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पॉईण्ट,सायन सर्कल,सायन (पूर्व),मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),कल्पतरु पॉईण्ट,सायन सर्कल,सायन (पूर्व),मुंबई-२२ यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.म.सं.राख,औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), मुंबई<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), मुंबई | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.म.सं.राख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), मुंबई- श्री. एच.एल.भुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), मुंबई - श्री. डी. टी.देवळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ७ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. त्यापैकी

मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भातील माहिती दि. ०३.०४.२०१० रोजी देण्यात आली आहे. ही माहिती विविध विभागाकडून दि. ०१.०४.२०१० रोजी प्राप्त झाली. उर्वरित माहिती दि. १८.०५.२०१० रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांना माहिती मिळाल्याची ही बाब मान्य केली. तथापि त्यांना खालील मुद्यांवरील माहिती मिळालेली नाही, असेही सांगितले.

१) मुद्दा क्र. ३ मध्ये नमूद केलेले - श्री. संदिप टोपे यांना कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी या पदावरुन क्षेत्रिय अधिकारी या पदावर पदोन्नती दिली आहे. ती ज्या नियमांआधारे देण्यात आली आहे, त्या शासननिर्णयाची प्रत - ही प्रत जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

२) मुद्दा क्र. ५ - श्री. अनंत नाना हर्षवर्धन यांची कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी या पदावरुन उपप्रादेशिक अधिकारी या पदावर नेमणूक करताना अवलंबविलेल्या कार्यपध्दतीची/परिपत्रकाची/शासन निर्णयाची प्रत - ही प्रत जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

३) मुद्दा क्र. ७ -त्रयस्थ श्री. अनंत नाना हर्षवर्धन हे ज्या पदावर कार्यरत आहेत, त्या पदावरील कर्मचाऱ्यांची ज्येष्ठतासूची - ही प्रत जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

अपिलार्थी यांना वर नमूद केलेली माहिती देय होत आहे.ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. त्याचप्रमाणे असे आढळून येत आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांचा निपटारा करण्यास प्रदूषण नियंत्रण कार्यालयाकडून विलंब होत आहे. यासाठी मंडळाच्या मुंबई कार्यालयातून अधिनस्त सर्व जन माहिती अधिकाऱ्यांना अधिनियमातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी परिपत्रकाद्वारे सूचना निर्गमित कराव्या लागतील.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), मुंबई यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही करण्यासाठी स्वतंत्र परिपत्रकाद्वारे सूचित करावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. म.सं.राख, द्वारा श्री. जी.एन.घुगे, प्लॉट नं.जी-८, सिडको, एन-४,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,कल्पतरु पॉईण्ट,सिनेप्लॅनेटसमोर,सायन सर्कलजवळ,रोड नं.८,सायन, मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,कल्पतरु पॉईण्ट,सिनेप्लॅनेटसमोर,सायन सर्कलजवळ,रोड नं.८,सायन, मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.दामोधर देवराव नेव्हाल, : अपीलकर्ता
रा.शिवराई,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार (पुरवठा),गंगापूर,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,वैजापूर,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद - प्रतिनिधी- श्री. आर.आर.खेत्रे,अ.का.(पु.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपविभागीय अधिकारी, वैजापूर,जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन २००२ ते २०१० अशा विस्तृत कालावधीची सोळा मुद्यांद्वारे माहिती

मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी सदरची माहिती संबंधित स्वस्तधान्य दुकानदाराकडून प्राप्त न झाल्याने आजपावेतो देऊ शकले नाहीत, असे सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले.जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,वैजापूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि. ०४.०५.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीच्या अर्जाप्रमाणे मुद्देनिहाय माहिती सात दिवसांचे आत द्यावी.या सर्व पार्श्वभूमीवर या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांना गांभीर्याने पाहावे लागेल व अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) अन्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्‍चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.याकडे उपविभागीय अधिकारी,वैजापूर यांना स्वत: लक्ष पुरवावे लागेल व अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी देतील, याची खातरजमा करावी लागेल व अपिलार्थीस आजपावेतो माहिती दिली नाही, याबाबत उपविभागीय अधिकारी यांना चौकशी करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१) जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्‍चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

२) अपिलार्थीस आजपावेतो माहिती दिली नाही, याबाबत उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांनी चौकशी करावी व पुढील यथायोग्य कारवाई योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दामोधर देवराव नेव्हाल,रा.शिवराई, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.फय्याज खान कबीर खान,रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.फय्याज खान कबीर खान व त्यांचे वकील श्री.एफ.ए.पठाण | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांचे वकील श्री.एफ.ए.पठाण यांच्यासह उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांचे वकील श्री.एफ.ए.पठाण यांनी आयोगास सुनावणीच्यावेळी सांगितले की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो मिळाली नाही. उपलब्ध

कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की,अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१५.०३.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस तीस दिवसांचे आत माहिती द्यावी. या सर्व पार्श्वभूमीवर या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांना स्वतः लक्ष पुरवावे लागेल व अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी देतील याची खातरजमा करावी लागेल. आतापर्यंत माहिती का देण्यात आली नाही, याबाबत पुढील कार्यवाही योजावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत जन माहिती अधिकारी विनामूल्य माहिती देतील, याची व्यवस्था करावी व माहिती देण्यास झालेल्या विलंबाची चौकशी करुन पुढील कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ११-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खान फय्याज कबीर खान, संत रोहिदासभवन समोर, रोहिदासपुरा, जुना मोंढा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.राजाराम श्रीधर भोंडे, : अपीलकर्ता
रा.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,पैठण,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.राजाराम श्रीधर भोंडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म-१),तहसील कार्यालय,पैठण,जि.औरंगाबाद - श्री. जी.डी. सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, पैठण,जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. एन.के.व्यास, लघुलेखक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | ३०.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.०८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |

विचाराधीन द्वितीय अपिलासंदर्भात यापूर्वी राज्य माहिती आयोग,औरंगाबाद खंडपीठाने सुनावणी घेऊन दि. १०.०३.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २५.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा. त्याबरहुकूम जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन दि. १२.०४.२०१० रोजी निर्णय दिला आहे. त्यामध्ये अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तहसीलदार यांचेतर्फे दि. ३०.०३.२०१० रोजी पुरविली आहे म्हणून अपील खारीज करण्यात येत आहे, असे नमूद केले आहे. अपिलार्थी आज उपस्थित आहेत. त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भातील वस्तुस्थितीची माहिती मिळाली असल्याकारणाने त्यांचे याबाबत पुढील काहीही म्हणणे नाही, असे आयोगापुढे प्रतिपादन केले. त्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाराम श्रीधर भोंडे,बालाजी मंदिरामागे, दुर्गावाडी,पैठण, जि.औरंगाबाद - ४३१ १०७.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-१),तहसील कार्यालय, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.नारायण बाबुराव वाकडे, : अपीलकर्ता
रा.टाकळी (अंबड),ता.पैठण,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, सजा टाकळी अंबड,ता.पैठण,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
नायब तहसीलदार,पैठण,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.नारायण बाबुराव वाकडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी, सजा टाकळी अंबड, ता.पैठण,जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी- नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय,पैठण,जि.औरंगाबाद - श्री. जी.डी.सोनवणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २२.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०८.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध झाली असून ती आज रोजी सोबत आणली आहे व ती ते अपिलार्थीस देऊ शकतात. आयोगाने सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहितीची मूळ प्रत व त्याची एक छायाप्रत दिली. अपिलार्थी यांनी ती माहिती पाहिली. यावर त्यांचे समाधान झाल्याचे सांगितले.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर प्रकरण बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण बाबुराव वाकडे,मु.पो.टाकळी (अंबड),ता.पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा टाकळी अंबड, ता.पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार(महसूल-१),तहसील कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.शेख हबीब पाशा पि.गुलाम रसुल, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.शेख हबीब पाशा पि.गुलाम रसुल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थीने सुनावणीच्यावेळी आयोगास सांगितले की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.उपलब्ध कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०६.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०६.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख हबीब पाशा पि.गुलाम रसूल,घर क्र.१-१६-३२,जुना बाजार,औरंगाबाद - ४३१ ००१

२. जन माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.सैय्यद मोबिनउद्दीन सै. अल्लाउद्दीन, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.सैय्यद मोबानउद्दीन सै. अल्लाउद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थीने सुनावणीच्यावेळी आयोगास सांगितले की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.उपलब्ध कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २२.०४.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २२.०४.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ११-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सैय्यद मोबिनउद्दीन सै.अल्लाउद्दीन,घर क्र.१-१२-७१,जुना बाजार,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय नामदेव वाहुळ,<br>रा. सिरसाळा, पो. अंभई, तालुका सिल्लोड,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बोरगांव (बाजार),<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजय नामदेव वाहुळ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बोरगांव (बाजार),<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद - श्री. एस. बी. शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. डी. ए. जायभाये, विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०-०२-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६ ते २००९ या कालावधीची ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २००७ मध्ये निवडून आलेल्या नवनिर्वाचित सदस्याबाबत व ग्रामपंचायतीस मिळालेल्या अनुदानाचा तपशील व खर्च झालेला तपशील अशी विस्तृत माहिती नमुना देऊन मागितली आहे. माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे त्या स्थितीत माहिती अधिकार अधिनियमानुसार देणे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे ती अपिलार्थीस देय होते. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०२-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्यास कार्यालयाची साधनसामग्री ही मोठ्या प्रमाणात वळवावी लागणार असल्यामुळे व उपलब्ध नसल्यामुळे अपिलार्थीस निरीक्षणास्तव खुली करुन ठेवण्यात आली आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही.

त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक ०६-०५-२०१० रोजी दिलेल्या निर्णयामध्ये ही बाब नमूद केली आहे. तथापि अपिलार्थीने प्रतिसाद दिलेला आढळून येत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांनी अपिलार्थीस अभिलेखे पाहण्यासाठी केलेला प्रस्ताव आयोगास योग्य वाटत आहे. अतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेखे पाहणीसाठी कार्यालयीन कामकाजाचे दोन दिवस निश्चित करुन सकाळी ११ ते ०५ या कालावधीत त्यांच्या कार्यालयात पाहणीकरिता मागितलेल्या सर्व माहितीचे अभिलेखे त्यांना उपलब्ध करुन द्यावे लागतील. ही बाब अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने कळवावी लागेल व पाहणीनंतर काही कागदपत्रांची आवश्यकता असल्यास त्याच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून दोन दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन

द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय नामदेव वाहुळ, रा. सिरसाळा, पो. अंभई, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बोरगांव (बाजार), तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अर्जून साहेबराव नवपुते, : अपीलकर्ता
मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. आर. एस. महाजन, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. बि-हाडे, विस्तार अधिकारी (सां.) | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. डी. टी. वाघमारे, पशूसंर्वधन अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०३-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि पशूसंवर्धन अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १८-०२-२०१० च्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांना एकंदर ११ मुद्दयांवर सन २००६ ते २०१० पर्यंत विस्तृत स्वरुपाची औरंगाबाद तालुक्यातील विविध योजनांवरची माहिती मागितली आहे. ही माहिती चार विभागाची असल्याकारणाने उप अभियंता, सिंचन यांनी त्यांच्या दिनांक १७-०३-२०१० च्या पत्राने अपिलार्थीस रुपये ५७०० इतक्या शुल्काचा भरणा करण्याबाबत (२८५० पृष्ठांच्या प्रती) कळविले. त्याचप्रमाणे कृषि विभागाच्या माहितीसाठी दिनांक १२-०३-२०१० रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांनी ३३०० रुपये (१६५० पृष्ठांकरिता) व दिनांक १८-०३-२०१० रोजी पशूसंवर्धन विभागाने रुपये १३०० (६५० पृष्ठांकरिता) भरणा करण्याचे अपिलार्थीस कळविले व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध ठेवण्यात आली. परंतु अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २६-०७-२०१० रोजी निर्णय दिला असून यामध्ये नमूद केल्याप्रमाणे एकंदर रुपये १०३०० इतक्या शुल्काचा पंचायत समिती कार्यालय, औरंगाबादकडे भरणा करुन माहिती हस्तगत करुन घ्यावी असा निर्णय दिला आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णयात नमूद केल्याप्रमाणे घरकुलाविषयी एकंदर १५००० पानांची माहिती एकत्रित करण्यासाठी काही कालावधी लागला त्यामुळे अपिलार्थीस कळविणे शक्य झाले नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी ही माहिती विनामूल्य द्यावी असा निर्णय घेतला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असेही अवगत केले की, त्यांच्याकडे ३०००० रुपयांचा निधी झेरॉक्स काढण्यासाठी उपलब्ध नाही. दिनांक २९-०७-२०१० रोजी अपिलार्थी यांना अभिलेख्याची पाहणी करण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहावे असे कळविले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेल्या विस्तृत माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत सात मुद्दयांच्या माहितीसाठी रुपये १०३०० इतक्या शुल्काचा भरणा करण्यासाठी कळविले आहे. त्यामुळे अपिलार्थीस हे शुल्क पंचायत समिती कार्यालयात भरुन माहिती हस्तगत करावी लागेल. उर्वरीत माहितीची व्याप्ती १५००० पानांची असल्यामुळे आणि त्याच्या झेरॉक्स प्रतिकरिता निधी उपलब्ध नसल्यामुळे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी उर्वरीत माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही

कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील उर्वरीत अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. तसेच शुल्काचा भरणा केल्यास माहितीच्या प्रती द्याव्यात. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अर्जून साहेबराव नवपुते, मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | ॲड मसुदुल्ला महेमुदूल्ला खान,<br>घर क्र. ए-६-२६९, आसेफिया कॉलनी, टाऊन हॉल, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - ॲड मसुदुल्ला महेमुदूल्ला खान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. आर. एस. जोशी (व. सा.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ११-०१-२०१० रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेतलेला नाही. याची गंभीर दखल आयोग घेत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना अपिलार्थीच्या दिनांक ११-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक आहे. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड मसुदुल्ला महेमुदूल्ला खान, घर क्रमांक ए-६-२६९, आसेफिया कॉलनी, टाऊन हॉल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नानासाहेब भाऊसाहेब पा. भवार, : अपीलकर्ता
रा. जाखमाथा, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद - श्री. पंचगल्ले संजय शिवराज | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. संगवे आर. डी., क. स. | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. गायकवाड ए. बी. पर्यवेक्षक, मदर तेरेसा इंग्लीश स्कूल, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०३-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २४-०५-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व शाळेचे पर्यवेक्षक उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व शाळेचे पर्यवेक्षक यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. त्यांच्या युक्तिवादावरुन असे आढळून येते की, मदर तेरेसा इंग्लीश स्कूल, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद ही कायम विनाअनुदानित शाळा आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ या शाळेस लागू होत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १७-०५-२०१० रोजी निर्णय दिला की, अर्जदार यांना हवी असलेली माहिती १५ दिवसाच्या आत विनाविलंब व विनाशुल्क द्यावी. या गोष्टी आयोगास विपरीत आढळून येत आहेत. याकरिता हे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांना अपिलार्थीच्या दिनांक १०-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर पुन्हा सुनावणी घ्यावी लागेल. मदर तेरेसा इंग्लीश स्कूल, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद ही शाळा कायम विनाअनुदानित असल्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. तथापि शासनाशी केलेल्या पत्रव्यवहारामुळे जी कागदपत्रे निर्माण झाली आहेत ती अपिलार्थीस देय होतील. तरी ही बाब विचारात घेऊन अपिलार्थी यांनी मागितलेल्या सर्व माहितीची पाहणी करुन अपिलार्थीस जी माहिती देय होईल ती देण्याची जन अपिलीय अधिकारी यांच्यावर विशेष बाब म्हणून जबाबदारी टाकण्यात येत आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या संचमान्यतेची माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या व्याख्येच्या स्पष्ट केलेल्या तरतुदीनुसार देय होत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत वर नमूद केल्याप्रमाणे सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा व अपिलार्थीस देय होत असलेली माहिती याच कालावधीमध्ये विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने देण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नानासाहेब भाऊसाहेब पा. भवार, रा. जाखमाथा, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नागोडे भानुदास कौतिकराव, : अपीलकर्ता
घृष्णेश्वर कॉलनी, प्लॉट नं. २२, चाळीसगांव रोड, कन्नड,
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, हिवरखेडा
रोड, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५६० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, हिवरखेडा रोड, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. मगरे आर. डी. (क. स.) | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३०-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २४-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०९-०५-२०११ रोजी देण्यात आली आहे. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थीचे दिनांक ०९-०५-२०११ रोजीचे राज्य माहिती आयोग खंडपीठास उद्देशून लिहिलेले पत्र आहे. त्यामध्ये अपिलार्थी यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असून त्यांची कोणतीही तक्रार नाही. करिता प्रकरण बंद करण्यात यावे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागोडे भानुदास कौतिकराव, घृष्णेश्वर कॉलनी, प्लॉट नं. २२, चाळीसगांव रोड, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, हिवरखेडा रोड, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रफिक महंमद शेख, : अपीलकर्ता
एन-७, सी-६७, पोलीस कॉलनी, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग,
सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५६१

२ सुनावणीची तारीख दि. १२-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
उप विभागीय अभियंता, ल. पा. जि. प. उपविभाग,
सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद
- श्री. दत्तात्रय किशन गवळे

३.३ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद
- प्रतिनिधी - श्री. आर. बी. जाधव, उप लेखापाल

३.४ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

कार्यकारी अभियंता, (सिंचन) जिल्हा परिषद, औरंगाबाद
- श्री. रावसाहेब मिराजी वाघमारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्याकरिता त्यांना रुपये ८२४ इतक्या शुल्काचा भरणा कार्यालयात करण्यात यावा असे दिनांक ०९-१०-२००९ रोजी कळविण्यात आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि अपिलार्थीचे दिनांक ०८-०७-२०१० रोजीच्या उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन) उपविभाग, सिल्लोड यांना लिहिलेल्या पत्राची प्रत आयोगासमोर आहे. त्यामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना मागितलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रफिक महंमद शेख, एन-७, सी-६७, पोलीस कॉलनी, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, ल. पा. जि. प. उपविभाग, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (सिंचन) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेश सांडुजी हिवराळे, : अपीलकर्ता
व्दारा, सोनवणे बी. व्ही. (वनपाल), घर क्रमांक २६१,
मिलींदनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास
आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
जन अपिलीय अधिकारी, :
आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजेश सांडुजी हिवराळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक - श्री. डी. आर. देसले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक - श्री. डी. के. पातमंद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांनी जी माहिती मागितली होती ती मिळाली नसून दुसरी मिळाली असल्याचे आयोगास अवगत केले. आयोगाने यावर पृच्छा केली असता जन अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्याकरिता अपिलार्थीस तीन वेळा कळविण्यात आले तथापि अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत, त्यामुळे माहिती देण्यात आली आहे असा कागदोपत्री निर्णय दिला आहे. या सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०५-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची दिनांक ३१ मे २०११ रोजी दुपारी ०१-०० वाजता पुन्हा सर्व बाबींचा साकल्याने विचार करता यावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत करणे योग्य ठरत आहे. अपिलार्थी यांनी या सुनावणीस उपस्थित राहण्याचे आयोगापुढे मान्य केले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०५-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर दिनांक ३१ मे २०११ रोजी दुपारी ०१-०० वाजता पुन्हा सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेश सांडुजी हिवराळे, व्दारा, सोनवणे बी. व्ही. (वनपाल), घर क्रमांक २६१, मिलींदनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश लक्ष्मणराव म्हैसमाळे, : अपीलकर्ता
इंदिरानगर, म. न. पा. केंद्रीय प्राथमिक शाळेसमोर,
मुकूंदवाडी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
लेखा अधिकारी (लॉटरी), उपसंचालक (वित्त व लेखा),
महाराष्ट्र राज्य लॉटरी यांचे कार्यालय, हाजी बंदर रोड, जी
क्लोरेज हाऊस, शिवडी (पूर्व), मुंबई - ४०० ०१५

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, हाजी
बंदर रोड, जी क्लोरेज हाऊस, शिवडी (पूर्व),
मुंबई - ४०० ०१५

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५६३

२ सुनावणीची तारीख दि. १२-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. गणेश लक्ष्मणराव म्हैसमाळे : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
लेखा अधिकारी (प्रशासन), उपसंचालक (वित्त व लेखा),
महाराष्ट्र राज्य लॉटरी यांचे कार्यालय, मुंबई - ४०० ०१५
- श्री. सु. मा. ढाकणे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी,
मुंबई - ४०० ०१५ - श्री. रा. आ. वसमणे

३.४ तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
लेखा अधिकारी (लॉटरी), उपसंचालक (वित्त व लेखा),

महाराष्ट्र राज्य लॉटरी यांचे कार्यालय, मुंबई - ४०० ०१५
- श्री. रा. द. गुरव

| | | | |
|---|---|---|---|
| ३.५ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, मुंबई - ४०० ०१५ - श्री. अ. रा. वालावलकर | : | उपस्थित |
| ३.६ | श्री. अर्जून दत्तु जूमे, अपिलार्थी यांचे मदतनीस | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०१-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १३-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे सहायक, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर ही बाब मान्य केली. दोन्ही बाजूंना ही बाब मान्य असल्यामुळे अपील निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत झाले आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश लक्ष्मणराव म्हैसमाळे, इंदिरानगर, म. न. पा. केंद्रीय प्राथमिक शाळेसमोर, मुकूंदवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी (प्रशासन), उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी यांचे कार्यालय, हाजी बंदर रोड, जी क्लॅरेज हाऊस, शिवडी (पूर्व), मुंबई - ४०० ०१५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, हाजी बंदर रोड, जी क्लोरेज हाऊस, शिवडी (पूर्व), मुंबई - ४०० ०१५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. खान कादर,<br>रा. मंजुरपुरा, मुर्गी नाला, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वॉर्ड अधिकारी, वॉर्ड अ, महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. खान कादर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, वॉर्ड अ, महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद<br>- श्री. एम. डी. सोनवणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत अशी ए-१, बी-१ कामाबद्दलची माहिती मागितली आहे. त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाहणी देण्यात आली. अपिलार्थी यांनी त्याप्रमाणे पाहणी करुन त्यातील त्यांना आवश्यक असलेली माहिती घेतली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली तथापि त्यांनी आयोगास सांगितले की, त्यांना ए-१ कामावरची माहिती मिळाली मात्र बी-१ कामाची माहिती मिळाली नाही. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी बी-१ कामाबाबतची माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खान कादर, रा. मंजुरपुरा, मुर्गी नाला, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, वार्ड अ, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सरदार हरजीतसिंग सहानी,<br>घर नं. ५-१-५५/१, उस्मानपुरा, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर भूमापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सरदार हरजीतसिंग सहानी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर भूमापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद - श्री. ब. ग. बांगर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद - श्री. कि. रा. तवरेज | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण चार मुद्दयांवर माहिती मागितली आहे. या माहितीच्या प्रती देण्याकरिता रुपये २७९१ इतक्या शुल्काचा भरणा करण्यात यावा असे अंतिमतः कळविण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, रुपये २७९१ ही रक्कम जास्त वाटते ती कोणत्या आधारे लावण्यात आली त्याचा खुलासा व्हावा. जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्या विभागाकडे असलेल्या, त्यांच्या विभागाकडून निश्चित केलेल्या दराने पी. आर.कार्ड प्रती नोंद १५ रुपये याप्रमाणे फी लावण्यात आली आहे व उर्वरीत कागदपत्रासाठी रुपये दोन याप्रमाणे शुल्क लावण्यात आले. ही बाब आयोगास योग्य वाटत आहे म्हणून या तपशीलाची जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती द्यावी लागेल व अपिलार्थी यांना त्याप्रमाणे त्यांचे समाधान झाले असल्यास शुल्काचा भरणा करुन माहिती घ्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीकरिता लावलेल्या शुल्काचा सविस्तर तपशील अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सरदार हरजीतसिंग सहानी, घर नं. ५-१-५५/१, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.बाळासाहेब सोपान थोरात, : अपीलकर्ता
रा.वीरगाव, ता.वैजापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,वैजापूर,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,वैजापूर,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाळासाहेब सोपान थोरात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वैजापूर, जि.औरंगाबाद - श्री. एस.ए.ठोंबरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, वैजापूर, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी डिसेंबरअखेर सेवानिवृत्ती स्वीकारली आहे. जुनी कागदपत्रे देण्यासाठी त्यांना काही कालावधी देण्यात यावा. अपिलार्थीस माहिती देण्यात येईल. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना मिळावी. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झालेला आहे. तरी जन माहिती अधिकारी यांना एक महिन्याची मुदत आयोग देत आहे. त्यांना एक महिन्याचे मुदतीत अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळासाहेब सोपान थोरात,मु.पो.वीरगाव,ता.वैजापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. उत्तमराव आसाराम बढे,<br>रा.गल्लेबोरगाव,ता.खुलताबाद,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, खुलताबाद,जि.औरंगाबाद<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,वैजापूर,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उत्तमराव आसाराम बढे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नायब तहसीलदार (पु.), तहसील कार्यालय,वैजापूर,जि.औरंगाबाद - श्री. एस.एस.लटपटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -तहसीलदार,वैजापूर, जि. औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपोटी ₹२७,०००/- शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहिती देण्यात येईल, असे

कळविण्यात आले आहे. ही रक्कम त्यांना स्वस्तधान्य दुकानदारांनी कळविल्याप्रमाणे कळविलेली आहे.पुढे त्यांनी असेही सांगितले की, दि. १९.०६.२०१० रोजी अपिलार्थी यांना काही माहिती पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, ₹२७,०००/- इतके शुल्क त्यांनी मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रतीकरिता होऊ शकत नाहीत. त्याचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी दिला नाही. त्यामुळे त्यांची दिशाभूल झाली आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती मिळालेली आहे. उर्वरित माहिती मिळालेली नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगापुढील कागदपत्रांवरुन आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, अन्नधान्य वितरण प्रणालीसंदर्भातील माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जांकडे संबंधित तहसील कार्यालयाकडून गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे येथे तसे केलेले दिसून येत नाही. याबाबत अपर जिल्हाधिकारी यांनी सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. याबाबत त्यांना सखोल चौकशी करावी लागेल व यामध्ये अधिकारी/कर्मचारी दोषी आढळल्यास दोषींविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करावी लागेल.त्याचप्रमाणे स्वस्तधान्य दुकानदारांकडून याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आढळल्यास त्यांच्यावरही नियमानुसार यथोचित कार्यवाही करणे आवश्यक ठरत आहे.

या प्रकरणी सकृतदर्शनी, जन माहिती अधिकारी व त्यांचे यासंदर्भातील सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती उशिराने देणे त्याचप्रमाणे माहितीसाठी अवाजवी शुल्क आकारणी करणे इ. प्रमाद घडला असल्याचे दिसून येत आहे. यास्तव अधिनियमातील कलम २० (१) नुसार जन माहिती अधिकारी/कर्मचारी यांना एकत्रित ₹ २५,०००/- शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल. या आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर तत्कालीन सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तामिल करावयाची जबाबदारी अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांची राहील.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणी सखोल चौकशी करावी व अपिलार्थीने मागितलेली माहिती तहसीलदार,खुलताबाद यांच्याकडून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पाठविण्यात येईल, याची खातरजमा करावी.

२) जन माहिती अधिकारी व त्यांचे यासंदर्भातील सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती उशिराने देणे त्याचप्रमाणे माहितीसाठी अवाजवी शुल्क आकारणी करणे इ. प्रमाद घडला असल्याचे दिसून आल्यामुळे संबंधित जन माहिती

अधिकारी/कर्मचारी यांना एकत्रित ₹ २५,०००/-शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तमराव आसाराम बढे, रा.गल्ले बोरगाव,ता.खुलताबाद,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

अपिल क्रमांक ५६७/२०१० सुनावणी दिनांक १२.५.२०११,
अपिलार्थी श्री. उत्तमराव आसाराम बढे, रा. गल्ले बोरगाव
ता. खुलताबाद जि.औरंगाबाद विरुध्द नायब तहसीलदार,
खुलताबाद जि. औरंगाबाद या निर्णयाबाबत

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद
शुध्दीपत्रकः- क्रमांक १०११/रामाआ/अपील/सीआर-५६७/२०१०/३७२९
दिनांक : २१ /६/२०११

वाचाः- १) क्रमांक २०११/अपील/सीआर-५६७/२०१०
दिनांक : १२/५/२०११

**शुध्दीपत्रकः-**

वरील संदर्भाधीन क्रमांक १ येथील मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांच्यापूढील सुनावणी झालेल्या अपील क्रमांक ५६७/२०१०, सुनावणी दिनांक १२.५.२०११ या निर्णयातील अनुच्छेद क्रमांक ३.२ व प्रत अनुक्रमांक २ येथील "जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,वैजापूर, जिल्हा औरंगाबाद-श्री. एस.एस. लटपटे" **या ऐवजी** "जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद-श्री. एस.एस. लटपटे" तसेच अनुच्छेद क्रमांक ३.३ व प्रत अनुक्रमांक ३ येथील "जन अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय,वैजापूर, जिल्हा औरंगाबाद" **या ऐवजी** "जन अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय,खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद" असे वाचावे.

(मा.राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद यांच्या मान्यतेने)

उपसचिव

राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१) श्री. उत्तमराम आसाराम बढे, रा. गल्ले बोरगाव तालुका खुलताबाद जिल्हा औरंगाबाद

२) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

३) जन अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय,खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

४) अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

५) निवडनस्ती

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.शेख शफीक शेख बुढन,<br>रा.औरंगाबाद. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अन्न धान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकुन,अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय,औरंगाबाद -प्रतिनिधी - श्रीमती सी.डी.शिंदे,अ.का. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -जिल्हा पुरवठा अधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख शफीक शेख बुढन,एन-६,सिडको,घर नं.एफ-१९/९,संभाजी कॉलनी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन,अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रविंद्र भागाजी खरात,<br>रा. करमाड,ता. जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. एन.के.व्यास,लघुलेखक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये संदर्भित जमिनीबाबत विहीत नमुन्यात अपिल तयार करुन देणेबाबत विनंती केली आहे. अशाप्रकारचे मूळ काम, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मधील 'माहिती'च्या व्याख्येत बसत नाही. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी अपिलार्थीस यासंदर्भात दि.२१.०४.२०१० रोजी कळविलेले आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थी यांना अपेक्षित असलेला अपिलाचा नमुना त्यांना देण्यात आला आहे. तो नमुना दि. २१.०४.२०११ रोजी त्यांनी स्वीकारला आहे.

या सर्व बाबी विचारात घेता, आयोगाचे स्तरावर प्रकरण बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र भागाजी खरात,रा.करमाड,ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कारभारी विश्वनाथ खरात,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी<br>कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार (महसूल),<br>जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद - श्रीमती सरिता सुत्रावे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - निवासी उपजिल्हाधिकारी,<br>औरंगाबाद - डॉ. भारत कदम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. त्यांनी प्रकरणाची सद्यस्थिती आयोगासमोर मांडण्यासाठी थोडा कालावधी देण्याची विनंती केली. सदर विनंती मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे.त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कारभारी विश्वनाथ खरात,घर नं.४/१७/३८-२, जगदंबा लॉज मागे,मिलकॉर्नर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सतिश गोविंदराव गाडगे, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,जालना.
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थीने सुनावणीच्यावेळी आयोगास सांगितले की,  जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आजमितीपर्यंत माहिती दिलेली नाही. तसेच त्यांच्या प्रथम अपिलावर अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही.याची आयोग गंभीर दखल घेत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली आहे. तथापि विशेष बाब म्हणून त्या मागे जी माहिती अभिप्रेत आहे.त्यासंबंधीचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१) श्री. पंढरीनाथ जानकु गायके, केस नं. १९७१/टीएनसी/यु/एससी/२ ही केस सन १९७१ ते७२ या कालावधीमध्ये दाखल केली असल्यास त्याच्या प्रती.

२) यावर तहसीलदार, जालना यांनी सुनावणी घेतली असल्यास त्याची प्रत.

३) व ४) या सुनावणीवर आदेश पारित केले असल्यास त्याची प्रत.

ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय,जालना यांना वर स्पष्ट केल्याप्रमाणे माहितीच्या प्रती नोंदणीकृत टपालाद्वारे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. जर अशाप्रकारची केस नसेल तर तसे स्पष्टपणे कळवावे लागेल. त्याचप्रमाणे तालुकानिर्मितीमध्ये संदर्भित प्रकरणाची नस्ती बदनापूर तालुक्यामध्ये स्थानांतरीत झाली असल्यास माहिती देण्यासंदर्भात त्याप्रमाणे व्यवस्था करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड.सतिश गोविंदराव गाडगे,घर नं.१०-३-२१९, प्रकाशनगर (पश्चिम),सिडको,एन-२,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,जालना. यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी,उदगीर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थीने सुनावणीच्यावेळी आयोगास सांगितले की, त्यांना आजपावेतो माहिती मिळालेली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतलेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील ज्येष्ठ (अधिनियमातील कलम १९(१)प्रमाणे) अधिकारी असतात त्याचप्रमाणे कार्यालयीन कामकाजाशी संपूर्ण ज्ञात असतात. यामुळे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्यासंदर्भात कार्यालयाकडून अपेक्षित कर्तव्य व अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विविध तरतुदींनुसार देय होत असलेली माहिती इत्यादींवर योग्य प्रकाश टाकून निर्णय घेऊ शकतात. यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर कार्यालयाकडून माहिती पुरविण्याकरिता येणाऱ्या तांत्रिक अडचणींसंदर्भात सारासार विचार होऊन अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य निर्णय घेण्यासाठी सक्षम असतात. या सर्व पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार करण्यात आलेली आहे. अत: या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमत: सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जावर सत्वर निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेण्याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,लातूर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०८.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील, एन-९,एच-१६४/०३,श्रीकृष्णनगर, टी.व्ही.सेंटर, चौकाजवळ, सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.तानसेन सुकलाल पारधी, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे शहर
जन अपिलीय अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५७३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक पोलीस आयुक्त(प्रशासन),पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे शहर,ठाणे. | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस उपायुक्त (मुख्यालय),पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे शहर,ठाणे | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५.०१.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या खंडपीठापुढे द्वितीय अपील क्रमांक ५०३/२०१० ची सुनावणी दिनांक ०६.०५.२०११ रोजी झाली त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी स्वतः उपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी असे एकूण पाच माहितीचे अर्ज त्यांच्याकडे केले आहेत व या पाचही माहितीच्या अर्जाची द्वितीय अपिले कोकण खंडपीठ व औरंगाबाद खंडपीठाकडे केली आहेत. कोकण खंडपीठापुढे या पाचही अर्जाच्या द्वितीय अपिलांवर सुनावणी झाली आहे त्यामुळे या खंडपीठापुढे अपिले घेण्यात येऊ नये अशी आयोगास विनंती केली. अपिलार्थी त्या सुनावणीस उपस्थित होते व त्यांनी त्यावेळी ही बाब मान्य केली आहे.

त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ११.०५.२०११ रोजी या खंडपीठास दिलेले पत्र आयोगासमोर आहे व त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या सर्व माहिती अर्जाच्या विचाराधीन द्वितीय अपिलांवर कोकण खंडपीठापुढे सुनावणी झाली आहे व कोकण खंडपीठाने त्यावर आदेश पारीत केले आहेत असे नमूद केले आहे. त्यामुळे सदरचे द्वितीय अपील निष्प्रभ ठरत आहे. या खंडपीठापुढील हे द्वितीय अपील प्रकरण रद्द करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तानसेन सुकलाल पारधी,प्लॉट नं.६,गंगाबावडीजवळ,वसुंधरा कॉलनी, छावणी, औरंगाबाद - ४३१००२.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे शहर,ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सरकटे गंगाराम यशवंत, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य लेखापाल,
वनसंरक्षक कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
वनसंरक्षक,वनविभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सरकटे गंगाराम यशवंत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्य लेखापाल, वनसंरक्षक कार्यालय, औरंगाबाद - श्री. वाय.एफ.पटेल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -सहायक वनसंरक्षक, वनविभाग, औरंगाबाद - श्री. आर.पी.पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०५.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास सांगितले की, अपिलार्थी यांनी दोन मुद्यांद्वारे त्यांच्या वैयक्तिक भविष्य निर्वाह निधीसंदर्भात सन १९९६ या वर्षाची माहिती मागितली आहे. माहिती जुनी असल्याकारणाने संबंधित अभिलेखे शोधण्यास थोडा वेळ लागला. त्याप्रमाणे मुद्दा क्र. १ ची माहिती दिली आहे. मुद्दा क्र.२ ची माहिती नागद रेंजमध्ये होती व त्याचे दोन रेंजमध्ये विभाजन झाल्यामुळे सदरच्या कागदपत्रांचा काही भाग उपवनसंरक्षक (वन्यजीव),नाशिक यांच्या कार्यालयाकडे गेला व काही भाग वैजापूर विभागाकडे गेला व कागदपत्रे हस्तांतरीत झाली आहेत.व त्यामध्ये कॅशबुकचा शोध इतर रेंजमध्ये घेतला तदनंतर ही माहिती शेवटी वैजापूर रेंजमध्ये सापडली व शेवटी अपिलार्थीस दि. ०५.०५.२०११ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे. अपिलार्थी यांनी सांगितले की, त्यांना एक वर्षाच्या कालावधीनंतर माहिती मिळालेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे असे प्रतिपादन केले व झालेला विलंब क्षमापित करण्यात यावा,अशी विनंती केली. अपिलार्थी यांनी सांगितले की, त्यांना त्यांच्या भ.नि.नि.च्या अंतिम प्रदानासाठी या माहितीची आवश्यकता होती. तथापि त्यांना भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदाने आता मिळालेली आहेत व या माहितीची आता आवश्यकता नाही.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर प्रकरण बंद करण्यात येत आहे. आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सरकटे गंगाराम यशवंत,सिडको,एन-७,एफ/११/६,अयोध्यानगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, वनसंरक्षक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, वनविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.निवृत्ती रंगनाथ चव्हाण,<br>रा.वैजापूर, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>साखर आयुक्त, म.रा.पुणे.<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहसंचालक (साखर),पुणे विभाग,पुणे. | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.निवृत्ती रंगनाथ चव्हाण व त्यांचे वकील श्री.एस.आर.ढेपले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक सहसंचालक (साखर),पुणे विभाग,पुणे - प्रतिनिधी - श्री.के.ए.शिंदे,विशेष लेखा परिक्षक वर्ग-१,कार्यालय सहसंचालक (साखर),सोलापूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.०२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०६.२००९ फेरसादर |

दि.२९.०६.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांच्या वकीलासह व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने सुनावणीच्यावेळी आयोगास सांगितले की, ते गंगापूर सहकारी साखर कारखाना येथे फीडर या पदावर कार्यरत होते. ते गंभीर आजाराचे रुग्ण आहेत. त्यांच्या सेवेतील थकित वेतन व भविष्य निर्वाह निधीच्या थकबाकीशी संबंधित प्रदाने अद्याप प्राप्त झालेली नाहीत तसेच अपिलार्थीने याबाबत आयोगास अवगत केले की, त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय झालेला नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १०.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालयाच्या सहकारी संस्थांच्या संदर्भात दिलेल्या निर्णयास अनुसरुन जी माहिती देय होत असेल ती माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. त्याचप्रमाणे अधिनियमातील कलम २(च) प्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),पुणे विभाग,पुणे यांना त्यांच्या स्तरावर अपिलार्थीस माहिती देण्याची कार्यवाही योजावी लागेल. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी म्हणून प्रादेशिक सहसंचालक (साखर),पुणे विभाग,पुणे यांना निश्चित करुन त्यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),पुणे विभाग,पुणे यांनी अपिलार्थीच्या दि.१०.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,वर नमूद केल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निवृत्ती रंगनाथ चव्हाण,मु.पो.देशपांडे गल्ली,वैजापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय सहसंचालक (साखर),पुणे विभाग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),पुणे विभाग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.